# प्रकरण चार

## शिक्षण विभाग

**4.67 अतिरिक्त् शिक्षक समायोजनाबाबत.**

**पंचायत समिती पनवेल, जिल्हा रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती पनवेलचे वित्तीय वर्ष 2016-2017 चे लेखे तपासले असता शिक्षण विभागाने अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन केलेले नाही. शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक पी.आर.ई. 1093/221/वशी-9, दिनांक 30/01/1996 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिप-511/प्र.क्र.54/आ-14, दिनांक 18/05/2011 अन्वये दरवर्षी दिनांक 30 सप्टेंबर अखेर जिल्हा परिषदेकडील शाळेतील विदयार्थ्यांची पटसंख्या निश्चित केल्यानंतर या आधारे अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा जादा प्राथमिक शिक्षकांच्या समायोजनाच्या बदल्या करण्याचे आदेश दिलेले आहे. शासन निर्णयातील अट क्रमांक 09 नुसार समायोजनाची तारीख 30 सप्टेंबर विचारात घेऊन जादा शिक्षकांचे समायोजन करणे आवश्यक आहे. शिक्षण विभागाचे लेखे तपासले असता 71 शाळांवर अतिरीक्त शिक्षक कार्यरत होते.

सदर अतिरिक्त शिक्षकांना जेथे विहीत मर्यादेपेक्षा कमी शिक्षक आहेत. अशा ठिकाणी बदली करून समायोजन करणे आवश्यक होते. तथापि सदर समायोजन विहित कालावधीत झालेले नाही.

**4.68 शालेय पोषण आहार मागणीपेक्षा कमी / जास्त पुरवठा करणे, विलंबाने पुरवठा केलेला असतांना दंड न आकारणेबाबत.**

**पंचायत समिती पनवेल, जिल्हा रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गट शिक्षणाधीकारी यांचे मागणी पत्र जावक क्रमांक पंसप/शालेय पोषण आहार/65/2016, दिनांक 07/10/2016 नुसार माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर 2016 ची इयत्ता 1 ली ते 5 वी ची मागणी पुरवठादाराकडे केली आहे. मागणीनुसार मसुर डाळ 4,776 किलो पुरवठा करणे आवश्यक असतांना पुरवठादाराने पुरवठा केलेला नाही. तसेच तुरडाळ 4,811 किलो, वाटाणे 4,742 किलो, सोयाबीन तेल 4,313 तेलाची मागणी केलेली असतांना पुरवठादाराने तुरडाळ 6,045 किलो, वाटाणे 6,065 किलो व मुगडाळ 6,105 किलोचा पुरवठा केलेला आहे. मागणीपेक्षा जास्त पुरवठा केल्याने करारनामामधील अट क्रमांक 7, 26 चे पालन पुरवठादाराने केलेले नाही.

2) जून/जुलै चा कालावधीची मागणी जावक क्रमांक पंसप/शालेय पोषण आहार/शिक्षण/51/2016, दिनांक 25/06/2016 नुसार पुरवठादाराकडे केली होती. करारनामातील अट क्रमांक 18 नुसार पुरवठादाराने मागणी केलेल्या धान्यादी मालाचा पुरवठा 20 दिवसांच्या आंत करणे आवश्यक होते. पुरवठादाराने या कालावधीतील धान्यादी मालाचा पुरवठा शाळाना विलंबाने केलेला आहे.

3) शालेय पोषण आहाराची मागणी शाळेमार्फत त्यांचेकडे शिल्लक असलेल्या धान्यादी मालानुसार पुरवठादाराकडे केली जाते. मात्र पुरवठादार मागणी केलेले धान्यादी मालाचा कमी/जादा किंवा काहीही पुरवठा न करता मागणी न केलेली धान्यादी मालाचा पुरवठा होत असल्याने ग्रामीण भागातील पाककृतीप्रमाणे शालेय पोषण आहाराचा लाभ होत नाही. करारनामातील अटींचे पालन पुरवठादारांकडून होते किंवा नाही, यावर सनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी ही गटशिक्षणाधिकारी व अधिक्षक (शालेय पोषण आहार) यांची असतांना सदर करारनामातील ब-याच अंशी अटींचे पालन केल्याचे दिसून येत नाही. शासनामार्फत मोठ्या प्रमाणात सदर योजनेवर खर्च करण्यात येत असल्याने सदर योजने संदर्भात अटी व शर्तीचे पालन होणे बाबत दक्षता घेणे आवश्यक आहे.

4) वर्षभरात जादा पुरवठा केलेल्या धान्याची वसूली करावी व जेथे मागणीपेक्षा पुरवठा कमी केला आहे तेथे दंडात्मक कार्यवाही करावी.

**4.69 शालेय पोषण आहार अंतर्गत कमी / जास्त धान्यादी मालाचा पुरवठा केलेबाबत.**

**पंचायत समिती खालापूर, जिल्हा रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** यावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती खालापूरचे सन 2016-2017 चे शालेय पोषण आहाराचे लेखे तपासले असता शिक्षण विभागाने पुरवठादाराकडे मागणी केलेल्या धान्यादी मालाचा पुरवठा कमी / जास्त प्रमाणात केलेला आहे. शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच निविदेतील अटीनुसार पुरवठादाराने मागणी केलेल्या प्रमाणातच धान्यादी मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे. जेणेकरून अनावश्यक पुरवठा केल्याने तसेच ते विनावापर पडू नये, असे यामागचा उद्देश आहे. असे असतांना पुरवठादाराने काही महिन्यात नोंदविलेल्या मागणी पेक्षा कमी / जादा पुरवठा केल्याचे निदर्शनास येते.

माहे जून, जुलै 2016 ची मागणी जावक क्रमांक पं.स.खा/शिक्षण/शालेय पोषण आहार/239/16, दिनांक 03/05/2016 नुसार पुरवठा दाराकडे नोंदणी केली होती. इयत्ता 1 ली ते 5 वी च्या मुलामुलींसाठी तुर डाळ 1,800 किलोची मागणी केली असतांना पुरवठा काहीही केला नाही. मुगडाळ मागणी केली नसतांना 1,740 किलो पुरवठा केला आहे. इयत्ता 6 वी ते 8 वी साठी तुरडाळ 1,855 किलो मागणी केली असतांना पुरवठा केला नाही. मुगडाळ मागणी केली नसतांना 1,125 किलो पुरवठा केला आहे. जादा पुरवठा केलेल्य धान्याची वसूली करावी

2) ऑगस्ट / सप्टेंबर 2016 ची मागणी दिनांक 04/08/2016 ला केलेली आहे. तुरडाळ 1 ली ते 5 वी 1,203 किलोची मागणी असतांना 1,345 किलो पुरवठा केला आहे. मुगडाळ 1,397 किलोची मागणी असतांना 1,665 किलोचा पुरवठा केलेला आहे. वाटाणा 1,312 किलोची मागणी असतांना 1,450 किलोचा पुरवठा केला आहे. इयत्ता 6 वी ते 8 वी साठी तुरडाळ 830 किलोची मागणी असतांना 1,135 किलो पुरवठा, मुगडाळ 990 किलो मागणी असतांना 1,320 किलो, वाटाना 1,000 किलो मागणी असतांना 1,305 किलो पुरवठा, तेल 683 लिटरची मागणी असतांना 948 लिटर पुरवठा केलेला आहे. सदर चार महिन्यांच्या मागण्या उदाहरण दाखल नमुद केलेल्या आहेत. प्रत्येक महिन्याच्या मागणीमध्ये पुरवठादाराने आवश्यकतेपेक्षा जादा पुरवठा केलेला असल्याने गरज नसतांना धान्यादी माल जास्त प्रमाणात प्राप्त होत असल्याने त्याबाबत गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जादा पुरवठा केलेल्य धान्याची वसूली करावी

3) माहे जून जुलै या कालावधीचे इयत्ता 1 ली ते 5 वी व इयत्ता 6 वी ते 8 वी चे धान्यादी मालाची मागणी दिनांक 03/05/2016 रोजी केलेली आहे. नियमानुसार 20 दिवसात पुरवठा करणे आवश्यक होते. सदर देयक रक्कम रूपये 12,08,048/- एवढया रक्कमेचे गट शिक्षणाधिकारी व शालेय पोषण आहार अधिक्षक यांनी मंजूरीसाठी शिफारस केलेले आहे. मात्र, सदर मागणीचा पुरवठा दिनांक 16/06/2016 ते 05/07/2016 या कालावधीत विलंबाने झालेला असतांना देखील देयकातून दंड कपात करणेबाबत शिफारस केलेली नाही. नियमानुसार दंड कपात केले नाही.

**4.70 जिल्हा परिषद शाळांमधील मुख्याध्यापकानी स्वतः नावे रकमा आहरीत केल्याबाबत.**

**पंचायत समिती मुरूड, जिल्हा रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती, मुरुड सन 2016-2017 शिक्षण विभागांतर्गत जिल्हा परिषद शाळा व खाजगी मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांमधील शालेय पोषण आहार संबंधीचे अभिलेखे (रोखावही / बँक विवरणपत्रे) यांची पडताळणी केली असता शालेय पोषण आहार संबंधीचे इंधन खर्च व मानधनाच्या जमा रकमा सर्व संबंधिताना मुंबई वित्तीय नियम 1959 मधील प्रधिकारानुसार रक्कम रूपये 500/- वरील रक्कम धनादेशाने अदा करणे आवश्यक असताना जिल्हा परिषद शाळा / माध्यमिक विद्यालय यांनी सदरच्या रकमा स्वतः (self) काढल्याचे दिसून येते. याबाबत शिक्षण विभागातील गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक / विस्तार अधिकारी / केंद्रप्रमुख यांनी शाळा भेटी दरम्यान सदर प्रदानाबाबतची अनियमितता लक्षात घेता उचित कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

तसेच शालेय पोषण आहार संबंधिचे साठ नोंदवह्या व इतर सर्वच नोंदवह्या व त्यातील नोंदी अपूर्ण असल्याचे दिसून आले. याबाबत पंचायत समिती स्तरावरून योजनेचे सनियंत्रण व्यवस्थितपणे केल्याचे दिसून येत नाही.

शाळांमधील मुख्याध्यापकांनी पोषण आहार मानधनाच्या रकमा स्वतः नावे काढण्याबाबत खुलासा करून सदर रकमा लाभधारकास अदा केल्याची खात्री पटवावी. भविष्यात रकमा प्रदानासंबंधी वाद निर्माण झाल्यास सर्व जबाबदारी निश्चित करून प्रदान रकमा धनादेशाद्वारे अदा करण्याची दक्षता घावी.

**4.71 शिक्षकांना दिलेल्या आगाऊ वेतनवाढीबाबत.**

**पंचायत समिती कळवण, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, कळवण सन 2016-2017 प्रमाणकांचे व सेवापुस्तकांचे लेखापरीक्षण केले असता प्रमाणक क्रमांक 61 दिनांक 31/03/2017 रक्कम रूपये 11,98,762/- एकूण 14 शिक्षकांचे दिनांक 01/10/2005 ते 28/02/2017 पर्यंत आगाऊ वेतनवाढीची देयक व प्रमाणक क्रमांक 207 दिनांक 31/03/2017 रक्कम रूपये 2,55,131/- केंद्रप्रमुख् आगाऊ वेतनवाढीचा फरक असे एकूण रूपये 14,53,893/- देयक मंजुर करून अदा केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने दिनांक 01/09/2015 रोजी झालेल्या बैठकीत गोपनीय अहवालांची छाननी करून आगाऊ वेतनवाढी कळवण गटात 14 शिक्षकांना व 1 केंद्रपमुखास दिनांक 01/10/2005 पासून मंजुर केलेल्या आहेत.

2) सहाव्या वेतन आयोगानुसार आगाऊ वेतनवाढीचा निर्णय झालेला नाही. तसेच 6 वा वेतन आयोग 01/01/2006 पासुन लागु झालेला आहे. परंतु, प्रत्यक्ष लागु फेब्रवारी 2009 पासून लागू झालेला आहे. आगाऊ वेतनवाढीचा निर्णय सन 2005 ते जानेवारी 2009 पर्यंत का घेण्यात आलेला नाही. 10 वर्षानंतर आगाऊ वेतनवाढीचा निर्णय घेणे नियमबाहय आहे.

3) श्री. रमेश् दावल काकुळते प्राथमिक शिक्षक हे दिनांक 21/05/2007 रोजी पंचायत समिती, कन्नड जिल्हा औरगांबाद येथे कार्यरत होते. ते दिनांक 22/05/2007 रोजी कळवण गटात हजर झाले. सदर शिक्षक 2005 रोजी जर औरगांबाद येथे कार्यरत होते. तर त्यांना जिल्हा परिषद नाशिककडून आगाऊ वेतन वाढी 2005 पासून कशा मंजुर केल्या? सदर शिक्षकांस रक्कम रूपये 1,14,560/- फरक अदा करतांना जुलै 2007 रोजी मुळ वेतन 11,280/- असतांना मुळ वेतन रूपये 10,870/- प्रमाणे फरक काढल्याने फेब्रवारी 2008 पर्यंत रककम रूपये 3,930/- जादा प्रदान झाली आहे.

4) श्रीमती लता नामदेव पवार यांना रक्कम रूपये 75,120/- फरक अदा केलेला आहे. त्यांना दिनांक 01/07/2016 ते 28/02/2017 पर्यंत रूपये 11,899/- फरक जादा प्रदान झालेला आहे.

5) श्री सुभाष नानाजी भामरे केंद्रप्रमुख यांना रक्कम रूपये 1,28,778/- फरक प्रदान करण्यात आलेला आहे. दिनांक 01/07/2016 रोजी मुळ वेतन रूपये 21,030/- असतांना मुळ वेतन रूपये 20,290/- प्रमाणे फरक काढतांना घेतलेने दिनांक 01/07/2016 ते दिनांक 28/02/2017 पर्यंत रक्कम रूपये 13,861/- जादा प्रदान झाले आहे.

6) आगाऊ वेतनवाढीचा निर्णय नियमबाहय असल्याने तसेच उशिरा निर्णय घेतल्याने घेतलेल्या निर्णयामुळे शासनाचे रक्कम रूपये 14,53,893/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. याबाबत योग्य खुलासा करणेत यावा.

**4.72 प्राथमिक शाळेतील मुलींचे उपस्थिती भत्त्याबाबत.**

**पंचायत समिती चांदवड, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 37) -** पंचायत समितीने सन 2016-2017 या वित्तीय वर्षात उपस्थिती भत्ता वाटपासाठी रक्कम रूपये 69,788/- इतका खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राथमिक शाळेत जाणा-या मुलींचे गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी शाळेत जाणा-या विद्यार्थीनींना शिक्षण व सेवायोजन विभाग, निर्णय क्रमांक पी.आर.ई. 1091/(9614)/ प्राशि.1, दिनांक 10/01/1992 नुसार प्रत्येक मुलीस

प्रती दिन रूपये 1 दराने उपस्थिती भत्ता देण्यात येतो. सदर योजनेंतर्गत उपस्थिती भत्ता शैक्षणिक वर्षातील एकूण दिवस 220 हा भत्ता रुपये 220/- च्या मर्यादेत 75 टक्के उपस्थिती अनिवार्य आहे. सलग तीन महिने अनुपस्थित असल्यास त्या काळापासून सत्र अखेरपर्यंत भत्ता मिळण्यास अपात्र आणि दारिद्रय रेषेखालील उत्पन्नाची मर्यादा ग्रामीण भागाशी रुपये 11,000/- व शहरी भागासाठी रूपये 11,850/- असणा-या पालकांच्या मुलीस अनुज्ञेय राहील तसेच शालेय शिक्षण विभाग, निर्णय क्रमांक पीआरई-1091/(9614)/प्राशि.1/ दिनांक 18/02/1993 अन्वये जोडपत्र अ परिच्छेद क्रमांक 5 व 6 प्रमाणे विस्तार अधिकारी शिक्षण/पर्यवेक्षक हे वरीलप्रमाणे लाभ अनुज्ञेयतेची तपासणी करतील व लाभार्थींच्या पालकांना ती रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा अहवाल गटशिक्षण अधिकारी यांना सादर करण्याबाबत वारंवार मागणी करुनही अहवाल लेखापरीक्षणाला प्राप्त झाले नाही. त्याकारणाने उपस्थिती भत्ता संबंधीत मुलींना नियमानुसार वाटप झाल्याची पडताळणी करता आली नाही

2) शालेय शिक्षण विभाग, निर्णय क्रमांक पीआरई-1091/(9614)/प्राशि.1, दिनांक 18/02/1993 च्या जोडपत्र अ परिच्छेद 8 प्रमाणे शिक्षण विस्तार अधिकारी एकूण लाभार्थींच्या 10 टक्के आणि गटशिक्षणाधिकारी यांनी 25 टक्के पालकांच्या भेटी घेऊन योजनेच्या अंमलबजावणीची खात्री करतील. नियमाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीबाबतच्या अभिलेख्यांची वारंवार मागणी करुन तसे अहवाल प्राप्त न झालेने उक्त शासन परिपत्रकांप्रमाणे भेटी घेवून अहवालाद्वारे योजना प्रभावीपणे राबविली गेल्याची खात्री पडताळणी करता आली नाही.

3) उपस्थिती भत्ता मुलींना त्यांचे बँक खाते खोलुन त्यांना वाटप केल्याबाबत व त्यांना प्राप्त झाल्याबाबतच्या पोहोच लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

## 4.73 सेवापुस्तकात नमूद केल्याप्रमाणे एम.एस.सी.आय.टी परीक्षा पास नसतांना शासन निर्णयाप्रमाणे वेतनवाढी रोखणे व वसुलची कार्यवाही न केलेबाबत.

**पंचायत समिती निफाड, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती निफाडच्या सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात, निवडक महीन्यातील फेब्रुवारी 2017 देय मार्च 2017 शिक्षण विभागाकडील प्राथमिक शिक्षकांचे वेतन देयक व सेवापुस्तक तपासतांना उदाहरणादाखल 35 कर्मचाऱ्यांना शासन धोरणाप्रमाणे संगणक हाताळणी व वापराबाबतचे ज्ञान आवश्यक असणेबाबत एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण नसतांना किंवा त्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेली नसतांना त्यांना दिनांक 01/07/2008 ते 30/06/2017 पर्यंतच्या वेतनवाढी मंजूर करुन रककम रूपये 71,49,646/- चे अतिप्रदान केल्याचे निदर्शनास आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शासकीय अधिसूचना क्रमांक सेप्रनि 1098/प्र.क्र.7/98/12, दिनांक 25/01/1999 अन्वय शासकीय सेवेतील गट 'अ', गट 'ब' आणि गट 'क' या पदांवर नियुक्ती करीता संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान आवश्यक अर्हता म्हणून ठरविण्यासाठी "महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम 1999"अधिसूचित करण्यात आलेले आहेत. शासन राजपत्र दिनांक 03/05/2000 अन्वये या विनियमांना दिनांक 01/01/2001 पासून प्रभाव देण्यात आलेला आहे. त्यानुसार सर्व शासकीय व जिल्हा परिषद कर्मचारी यांना सदर नियमान्वये नियुक्तीपासून दोन वर्षाच्या आंत 5 शासनमान्य संगणक संस्थांचे प्रमाणपत्र सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

2) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 10/07/2000 च्या शासन निर्णयातील अनुक्रमांक 13 द्वारे यापुर्वी शासनमान्य संस्थांकडून प्रमाणपत्र मिळालेल्या तसेच शासनाकडून प्रशिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती व प्रोत्साहनपर रक्कम घेतली आहे किंवा मागणी केली आहे, त्यांना चाचणी परीक्षा उत्तीर्ण करण्याची मुदत सुरुवातीला दिनांक 20/07/2003 पर्यंत किंवा कर्मचा-यांच्या वयाची 50 वर्षे पुर्ण होण्याच्या आत व शासन निर्धारीत करील त्या विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

3) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण /प्र.क्र/5/2001/39, दिनांक 20/07/2002 अन्वये ज्यांची निवड प्रक्रिया दिनांक 01/01/2001 रोजी किंवा त्यापुर्वी पासून सुरु झालेली आहे अशा गट-अ, गट-ब

आणि गट-क मधील सर्व शासकिय व कर्मचारी यांना संगणक हाताळणीबाबतचे ज्ञान असणेसाठी एमएससीआयटी. ही परीक्षा वय वर्षे 50 पुर्ण होण्याच्या आत व शासन निर्धारीत करील, त्या विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

4) जुन्या कर्मचा-यांच्याबाबत चाचणी परीक्षा व नवीन कर्मचा-यांच्याबाबत एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण वय 50 पुर्ण होण्याच्या आत किंवा शासनाने दिलेल्या अंतिम मुदतीच्या आंत उत्तीर्ण न झाल्यास संबंधितांच्या वेतनवाढी रोखणे, त्यांना पदोन्नतीसाठी पात्र न धरणे इत्यादी कार्यवाही करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

5) शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती-4/224/39, दिनांक 05/05/2007 अन्वये सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दिनांक 31/12/2007 ही शेवटची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे दिनांक 01/01/2008 पासून पुढे व वय वर्षे 50 पूर्ण होण्याच्या आत जिल्हा परिषद कर्मचा-यांनी एमएससीआयटी. संगणक परीक्षा तात्काळ उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अन्यथा दिनांक 01/01/2008 नंतर दिनांक 01/07/2008 व त्यापुढील दरवर्षीच्या नियत वेतनवाढी रोखणे आवश्यक आहे. दिनांक 01/07/2008 ते 30/06/2017 पर्यंतच्या वेतनवाढी देय नसतांना त्यांना सदर वेतनवाढी मंजूर करुन वेतन - भत्ते प्रदान केल्याने अतिप्रदान झाले असून दिनांक 01/07/2008 ते 30/06/2017 या कालावधीत दरमहा झालेल्या अतिप्रदानाची एकूण रक्कम रुपये 71,46,918/- संबंधितांकडून वसूल करुन योग्य त्या शासन लेखाशिर्षामध्ये भरणा करुन चलनाच्या प्रतीसह अनुपालन सादर करावे.

सदर आक्षेपातील नमूद नावे केवळ उदाहरणादाखल असून गटविकास अधिकारी यांनी याबाबत संबंधितांना सुचना देवून वरीलप्रमाणे असणाऱ्या इतर सर्व समान प्रकरणांचा शोध घेऊन त्यांचेकडून अतिप्रदानाची रक्कम वसुल करण्याची कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे. याबाबत असेही अभिप्राय देण्यात येत आहेत की, संबंधित विभागाचे प्रमुख म्हणून संबंधित गटशिक्षण अधिकारी व कार्यालय प्रमुख म्हणून गट विकास अधिकारी या दोन्ही अधिकाऱ्यांनी शासनाच्यावतीने कामकाज करतांना शासन निर्णयांचे / शासनाच्या ध्येय धोरणाचे पालन होईल, याबाबत आवश्यक ती दक्षता घेतलेली दिसून येत नाही.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, 1968 चे नियम 3 चे परिशिष्ट एक मधील नियम क्रमांक 1(1) चा (क) तसेच परिशिष्ट चार मधील भाग-ब, उपविभाग (1) मधील नियम क्रमांक 18 आणि 19 (3) नुसार, जिल्हा परिषदेचे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांचे / कार्यालयांचे अंतर्गत लेखापरीक्षण दरवर्षी करुन लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे अंतर्गत लेखापरीक्षणाअभावी प्रभावी वित्तीय नियंत्रण राहू शकत नाही. तसेच नियमितपणे अशी पडताळणी होत नसल्याने वरील प्रमाणे आवश्यक ती परीक्षा उत्तीर्ण नसतांनाही दिलेल्या वेतनवाढीमुळे झालेली अतिप्रदानाची प्रकरणे वेळीच उघडकीस येत नाहीत व शासनाचे आर्थिक नुकसान होत असते.

तरी संबधितांकडुन उपरोक्त प्रमाणे रक्कम रुपये 71,46,918/- वसुल करणे आवश्यक आहे.

### 4.74 संगणक परिक्षा विहित मुदतीत पास न करता पदोन्नती देणे व नियमित वार्षिक वेतनवाढी मंजूर करणेबाबत

**पंचायत समिती धुळे, जिल्हा धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** याबाबत रक्कम रुपये 2,37,01,149/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-2000/ प्र.क्र.-5/2001/39, दिनांक 20/07/2002 व सुधारीत शासन निर्णय सेप्रवि-2002/प्र.क्र.14/2/12, दिनांक 02/09/2003 अन्वये संगणक परिक्षा शासकिय सेवेतील कर्मचारी यांना उत्तीर्ण होणे अनिवार्य असतांना व अंतिम मुदतवाढ दिनांक 31/12/2007 पावेतो मुदत वाढ देण्यात आलेली आहे. दिनांक 31/12/2007 पर्यंत विहित मुदतीत परिक्षा पास न करणा-या कर्मचारी यांचे वार्षिक वेतनवाढी रोखणेबाबत आदेश आहेत. शिक्षण विभाग, पंचायत समिती अंतर्गत कर्मचारी यांनी विहित मुदतीत परिक्षा पास केलेली नाही व त्यांना वेतनवाढी देण्यात आलेल्या आहेत. सबब शासन आदेशाचे पालन न करता वेतनवाढी मंजूर करुन जादा खर्च केलेला आहे.

2) सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट क्रमांक 15 मधील नमुद कर्मचारी यांनी संगणक परिक्षा उत्तीर्ण केलेली नाही, याबाबत सेवा पुस्तकात नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत व शासन निर्णयानुसार वेतनवाढी थांबविण्यात

आलेल्या नाहीत व नियमित वेतनवाढी मंजूर केलेल्या आहेत. त्यामुळे संबंधीत कर्मचारी यांना रुपये 2,37,01,149/- जादा प्रदान झालेले आहेत व नियमितपणे दर महा प्रदान होत आहे.

3) शिक्षण विभाग, पंचायत समितीने एमएससीईटी परिक्षा उत्तीर्णबाबत खात्री करुन व प्रत्यक्ष सेवापुस्तकाप्रमाणे पडताळणी करणे आवश्यक आहे. परिशिष्ट क्रमांक 15 मध्ये नमुद कर्मचारी यांची जादा वेतन प्रदान झाल्याबाबत परिगणीत केलेली रक्कमेची पंचायत समिती स्तरावरुन पडताळणी करुन खात्री करण्यात यावी. उपरोक्त शासन निर्णयानुसार अनुज्ञेय नसलेली रक्कम रुपये 2,37,01,149/- शासकीय अनुदानासाठी पात्र ठरत नाही.

4) अर्ध समास पत्र क्रमांक 12, दिनांक 05/08/2017 अन्वये याबाबत प्राधिकार उपलब्ध करुन देणे व वेतनवाढी शासनाच्या आदेशाचे पालन न करता मंजूर केलेल्या आहेत. याबाबत अभिप्राय कळविणेबाबत कळविण्यात आलेले होते. त्यास शिक्षण विभागाने अभिप्राय कळविलेले नाहीत.

5) लेखापरिक्षणात साधारणपणे 10 टक्के सेवापुस्ताकाची पडताळणी केली असता वरीलप्रमाणे रक्कम जादा प्रदान दिसून येते. तरी शिक्षण विभागात सर्व सेवापुस्तकाची पडताळणी करुन एमएससीईटी परिक्षा पास नसलेल्या व विहित मुदतीत पास न झालेल्या कर्मचारी यांना अदा केलेली जादा प्रदानाची रक्कम वसुलीबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. शासन निर्णय दिनांक 02/09/2003 चे पालन न करता वेतनवाढी मंजूर केल्याने मोठया प्रमाणात शासकीय अनुदानावर भार निर्माण करुन शासनाचे दायीत्व वाढविण्यात आलेले आहे.

**4.75 आरोग्य विभागातील कर्मचारी यांनी संगणक परिक्षा विहित मुदतीत पास न करता पदोन्नती देणे व नियमित वार्षिक वेतनवाढी मंजूर करणेबाबत.**

**पंचायत समिती धुळे, जिल्हा धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** याबाबत रक्कम रुपये 12,22,210/- खर्च करण्यात आला आहे. आरोग्य विभागाचे सेवापुस्तकाचे लेखापरिक्षण करतांना एमएस सीईटी परिक्षा पास नसलेल्या कर्मचारी यांना वार्षिक वेतनवाढी व आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ मंजूर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-2000/ प्र.क्र.-5/2001/39, दिनांक 20/07/2002 व सुधारीत शासन निर्णय सेप्रवि-2002/प्र.क्र.14/2/12, दिनांक 02/09/2003 अन्वये संगणक परिक्षा शासकीय सेवेतील कर्मचारी यांना उत्तीर्ण होणे अनिवार्य असतांना व अंतिम मुदतवाढ दिनांक 31/12/2007 पावेतो मुदत वाढ देण्यात आलेली आहे**.** दिनांक 31/12/2007 पर्यंत विहित मुदतीत परिक्षा पास न करणा**-**या कर्मचारी यांचे वार्षिक वेतनवाढी रोखणेबाबत आदेश आहेत**.** आरोग्य विभाग, पंचायत समिती अंतर्गत कर्मचारी यांनी विहित मुदतीत परिक्षा पास केलेली नाही व त्यांना वेतनवाढी देण्यात आलेल्या आहेत**.** सबब शासन आदेशाचे पालन न करता वेतनवाढी मंजूर करुन जादा खर्च केलेला आहे**.**

मुळ अहवालामध्ये नमूद केलेल्या 17 कर्मचारी यांनी संगणक परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे, याबाबत सेवापुस्तकात नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. शासन निर्णयानुसार वेतनवाढी थांबविण्यात आलेल्या नसून नियमित वेतनवाढी मंजूर केलेल्या आहेत. त्यामुळे रुपये 12,22,210/- जादा प्रदान संबंधीत कर्मचारी यांना झालेले आहे व नियमितपणे दरमहा प्रदान होत आहे.

आरोग्य विभाग, पंचायत समितीने एमएससीईटी परिक्षा उत्तीर्णबाबत खात्री करुन व प्रत्यक्ष सेवापुस्तकाप्रमाणे पडताळणी करणे आवश्यक आहे. नमुद कर्मचारी यांची जादा वेतन प्रदान झाल्याबाबत परिगणीत केलेली रक्कमेची पंचायत समिती स्तरावरुन पडताळणी करुन, खात्री करण्यात यावी. उपरोक्त शासन निर्णयानुसार अनुज्ञेय नसलेली रक्कम रुपये 12,22,210/- शासकीय अनुदानासाठी मान्य ठरत नाही.

लेखापरिक्षणात साधारणपणे 10 टक्के सेवापुस्ताकाची पडताळणी केली असता वरीलप्रमाणे रक्कम जादा प्रदान येते. तरी आरोग्य विभागात सर्व सेवापुस्तकाची पडताळणी करुन एमएससीईटी परिक्षा पास नसलेल्या व विहित मुदतीत पास न झालेल्या कर्मचारी यांना अदा केलेली जादा प्रदानाची रक्कम वसुलीबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**4.76 दिर्घ- सुट्टीच्या कालावधीसाठी वाहतूक भत्ता प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती साक्री, जिल्हा धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 23) -** याबाबत रक्कम रुपये 7,97,585/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती, शिक्षण विभागाकडील वेतन देयकाच्या पडताळणी करतांना माहे मे 2016 व जुन 2016 या शिक्षकांच्या दिर्घ सुटीच्या कालावधीत सदर शिक्षकांना वाहतुक भत्ता प्रदान करण्यात आला आहे.

वित्तं विभाग, शासन परीपत्रक क्रमांक वाहभ 1099/प्रं.क्रं.45/सेवा-5, दिनांक 09/05/2003 मधील मुददा क्रमांक 5 (I) नुसार दिर्घ सुट्टीचा कालावधी 30 दिवसापेक्षा जास्त असल्यास वाहतुक भता अनुज्ञेय होत नाही.

सन 2015-2016 या आर्थिक वर्षात उन्हाळी सुट्टी दिनांक 02/05/2016 ते 14/06/2016 शिक्षकांच्या दिर्घ सुट्टीचा कालावधी असुन सदर कालावधी 30 दिवसापेक्षा जास्त असुन या कालावधीत वाहतुक भत्ता अनुज्ञेय नसतांना प्रदान करण्यात आल्याने वाहतुक भत्ता रकमेचे जादा प्रदान झालेले आहे. तरी मे 2016 व जुन 2016 चे सुट्टीच्या जादा प्रदान वाहतुक भत्याची रक्कम रूपये 7,97,585/- वसुल करावी.

**4.77 श्री. व्हि.पी.बागले, केंद्र प्रमुख, प्राथमिक शिक्षक व श्री. सुभाष शेनपडु शिरसाठ विकास अधिकारी, शिक्षण हे MS-CIT परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण न झाल्याने वेतनाचे जादा प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती सिंदखेडा, जिल्हा धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 24 व 37) -**याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

श्री. व्हि.पी.बागले, केंद्र प्रमुख व श्री. सुभाष शेनपडु शिरसाठ विकास अधिकारी, शिक्षण हे सामान्य प्रशासन विभागातील शासन निर्णय क्रमांक मानस/नस्ती 4/224/39 दिनांक 05/05/2007 अन्वये MS-CIT अर्हता परीक्षा विहित मुदतीत म्हणजे दिनांक 31/12/2007 पर्यंत उत्तीर्ण होणे आवश्यक होते. तथापि, ते विहित मुदतीत सदरची परीक्षा उत्तीर्ण न झाल्याने त्यांना नियमित वेतनवाढी देय नाहीत. तथापि, त्यांना नियमित वेतनवाढी दिल्याने वेतन भत्त्याचे जादा प्रदान रक्कम रुपये 15,13,276/- वसूल करून सदरची जादा प्रदान रक्कमेची अचुक पडताळणी करुन वसुली करावी.

**4.78 सेवा पुस्तकात एम.एस.सी.आय.टी परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या नोंदी न घेतलेबाबत.**

**पंचायत समिती नवापूर, जिल्हा नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 56) -** पंचायत समिती आरोग्य, ग्रामपंचायत, सामान्य प्रशासन, ए.बा.वि.से.यो., शिक्षण इत्यादी विभागाकडील सेवा पुस्तकाची लेखापरिक्षेणात पडताळणी केली असता बहुतांश विभागातील कर्मचा-यांचे सेवापुस्तकात एमएससीआटी (संगणक परिक्षा) उत्तीर्ण केलेबाबतच्या नोंदी घेतल्याचे दिसून येत नाही. यावरुन सदर कर्मचाऱ्यानी संगणक परिक्षा उत्तीर्ण केलेबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) शासन निर्णय क्रमांक मातंसे/नस्ती04/224/39 दिनांक 05/05/2007 अन्वये दिनांक 01/01/2007 ते 31/12/2007 अखेर उत्तीर्ण करणेबाबत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

2) उपरोक्त शासन निर्णयानुसार आरोग्य व इतर सर्व विभागातील कर्मचा-यांच्या सेवापुस्तकात नोंदी नसल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांनी संगणक परिक्षा कधी उत्तीर्ण केली? याबाबत खात्री करता आली नाही. त्यामुळे उक्त शासान निर्णयानुसार विहित मुदतीत परिक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य आहे. संबंधीत कर्मचा-यांनी सदरची परिक्षा कधी उत्तीर्ण केली? याबाबत खात्री करण्यात येऊन तशा सेवापुस्तकात प्रमाणपत्राच्या छायांकीत प्रती प्रमाणित करुन नोंदी घेऊन, सक्षम प्रधिकाऱ्याची स्वाक्षरी घेण्यात येऊन अनुपालन दर्शवावे.

3) विहित मुदतीत परिक्षा उत्तीर्ण न केलेल्या कर्मचाऱ्यांचे माहे जानेवारी 2008 पासुन पुढील वेतनवाढी रोखण्यात येऊन अतिप्रदान वेतन व भत्याची परिगणना करण्यात येऊन अनुपालन दर्शवावे.

**4.79 दिर्घ सुटीच्या कालावधीत प्राथमिक शिक्षकांना वाहतुक भत्ता व प्रोत्साहन भत्ता नियमबाहय प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती तळोदा, जिल्हा नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नंदुरबार यांचे व सण 2016-2017 या शैक्षणिक वर्षाकरीता सर्व माध्यमांच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना द्यावयाच्या सुटयांबाबत यादी दिलेली आहे. त्यात उन्हाळी सुट्टी दिनांक माहे मे 2015 ते जुन 2015 अखेर घेण्यात यावी, असे आदेश दिले आहेत व दिर्घ सुटी कालावधीत त्यांना वाहतुक भत्ता व प्रोत्साहन भत्ता दिला आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक वाहभ-1099/प्रक्रं 45/सेवा-5, दिनांक 09/05/2003 मुददा क्रमांक 5(1) अन्वये दिर्घ सुटीचा कालावधी 30 दिवसापेक्षा जास्त असेल, तर वाहतुक भत्ता अनुज्ञेय असणार नाही, असे स्प्ष्टीकरण दिलेले आहे. असे असतांना नियमबाहय प्रदान केलेले आहे. सदर रकमेची परिगणना माहे मे-2016 च्या वेतन देयकातून करुन रक्कम वसुल करावी व महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक आस्था 1097/प्र.क्र.18/का15, दिनांक 15/11/1997 अन्वये 30 दिवसापेक्षा जास्त कालावधीत प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय असनार नाही, अशी तरतूद असताना नियमबाहय प्रोत्साहन भत्ता रूपये 2,81,983/- व रूपये 3,88,579/- एकुण रूपये 6,70,562/- दिलेला आहे. तरी नियमबाहय प्रदान केलेली रक्कम वसूल करावी.

**4.80 धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे जिल्हा परिषद, नंदुरबार जिल्हा निधीचे खाते बंद करुन ते राष्ट्रीय बँकेत उघडणेबाबत.**

**पंचायत समिती तळोदा, जिल्हा नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 40) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पिका 2012/प्रक.80/वित्त-3, दिनांक 08/08/2012 अन्वये धुळे व नंदुरबार मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त केल्याने व त्यास बँक परवाना नुतनीकरण अदयाप मिळालेले नसल्याने धुळे व नंदुरबार मध्यवर्ती सहकारी बँकेतील जिल्हा परिषदेची खाती बंद करुन राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. परंतु, दिनांक 31/03/2017 अखेर पंचायत समितीमधील रक्कम रुपये 1,80,63,126/- बँकेत गुंतलेली आहे व त्यात शासनाचे अनुदान रकमेचा समावेश आहे. तरी मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी त्वरीत कार्यवाही करुन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक अआर2013/प्रक्र.-3/वित्त-2, दिनांक 04/02/2014 अन्वये जिल्हा परिषदेकडीलतन व वेतनेतर अखर्चित निधी शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

**4.81 दिर्घ सुटीच्या कालावधीत प्राथमिक शिक्षकांना वाहतुक भत्ता व प्रोत्साहन भत्ता नियमबाहय प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती शहादा जिल्हा नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नंदुरबार यांचे व सन 2016-2017 या शैक्षणिक वर्षाकरीता सर्व माध्यमांच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना द्यावयाच्या सुटयांबाबत यादी दिलेली आहे. त्यात उन्हाळी सुटी दिनांक 01/05/2016 ते 15/06/2016 अखेर घेण्यात यावी, असे आदेश दिले आहे व दिर्घ सुटी कालावधीत त्यांना वाहतुक भत्ता व प्रोत्साहन भत्ता दिला आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक वाहभ-1099/प्रक्रं 45/सेवा-5, दिनांक 09/05/2003 मुददा क्रमांक 5(1) अन्वये दिर्घ सुटीचा कालावधी 30 दिवसापेक्षा जास्त असेल, तर वाहतुक भत्ता अनुज्ञेय असणार नाही, असे स्प्ष्टीकरण दिलेले आहे. असे असतांना रुपये 3,13,400/- नियमबाहय प्रदान केलेले आहे व महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक आस्था 1097/प्र.क्र.18/का15, दिनांक 15/11/1997 अन्वये 30 दिवसापेक्षा जास्त कालावधीत प्रोत्साहन भत्ता अनुक्षेय असनार नाही, अशी तरतूद असताना नियमबाहय प्रोत्साहन भत्ता रूपये 9,64,416/- दिलेला आहे. तरी नियमबाहय प्रदान केलेली रक्कम वसूल करावी.

**4.82 केंद्र प्रमुखांना दरमहा रुपये 1,650/- नियमबाहय प्रवास भत्ता प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती शहादा, जिल्हा नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक पीआरई 2012/प्र.क्र.77/प्राशि-1, दिनांक 22/03/2013 अन्वये केंद्र प्रमुखांना शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक 14/11/1994 च्या शासन निर्णयानुसार वेतन उद्दिष्टांमधुन रुपये 200/- एवढा कायम प्रवास भत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे. सदर कायम प्रवास भत्ता वित्त विभागाच्या मुंबई नागरी सेवा नियम 1959 मधील नियम 383 अन्वये लागू करण्यात आलेला नाही. यास्तव, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास 1010/प्र.क्र.2/सेवा-5, दिनांक 03/03/2010 अन्वये कायम प्रवास भत्याच्या दरात सुधारणा करण्यात आली असली, तरी सदर दर (रुपये 1,650/-) हे केंद्र प्रमुखांना लागू होत नाहीत. असे असताना केंद्र प्रमुखांना कायम प्रवास भत्याचे नियमबाहय प्रदान केलेले आहे.

**4.83 शालेय पोषण आहाराबाबत.**

**पंचायत समिती जळगाव, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 52)**

**पंचायत समिती चोपडा, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 55)**

**पंचायत समिती मुक्ताईनगर, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 38)**

**पंचायत समिती भुसावळ, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17)**

**पंचायत समिती चाळीसगाव, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 55)**

**पंचायत समिती भडगाव, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5)**

**पंचायत समिती पारोळा, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 47)**

**पंचायत समिती एरंडोल, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 32)**

**पंचायत समिती अमळनेर, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20)**

**पंचायत समिती धरणगाव, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 47)**

**पंचायत समिती बोदवड, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 48) -** सदरबाबत पंचायत समिती, बोदवड, जळगाव, भुसावळ, चाळीसगाव, एरंडोल, चोपडा, मुक्ताईनगर, पारोळा, धरणगाव, भडगाव व अमळनेर चे वित्तीय वर्ष 2016-17 मध्ये एकूण रक्कम रुपये 18,00,25,621/- खर्च झालेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती बोदवडने अखर्चित अनुदान रुपये 25,68,230/- शासन खाती जमा करणे आवश्यक असतांना ते जमा केलेले नाही.

2) सदर योजनेअंतर्गत प्रथिनेयुक्त दुपारचे भोजन देण्यात येणा-या आहारात महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोयो -2009 प्रा.शि.-4, दिनांक 18/06/2009 व शासन निर्णय क्रमांक शापोयो -2015/प्र.क्र.177/एसडी-3, दिनांक 12/10/2015 मध्ये नमुद केलेप्रमाणे घटक आहेत. याची खात्री करण्यासाठी प्रयोगशाळेतुन तपासणी अहवाल प्राप्त करावयाचा आहे. तथापि, चाचणी अहवाल घेतलेला नाही.

3) वित्त् विभाग, शासन निर्णय क्रमांक मआखा-1099 प्रा.क्र. 1699 विनियम, दिनांक 28/10/2004 अन्वये दुभार प्रतिबंधीत नोंदवही ठेवलेली नसल्याने दुभार प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) गटाने वित्तीय वर्षात उचललेल्या तांदुळ हिशोबाची गट स्तरावर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

5) पंचायत समिती, जळगावकडून शाळा स्तरावर वेळोवेळी भेटी देवून शासन निर्णय क्रमांक शापोअ 2009/प्र.क्र.136/ प्रशि-4, दिनांक 18/06/2009 नूसार जमा खर्च/असलेल्या पोषण आहाराची पाहाणी केल्याबाबतची अहवाल नस्ती आढळली नाही.

6) प्राथमिक शाळेवर खिचडीसाठी लागणारी साहीत्याची प्रत्येक महिन्यात गोषवारा काढलेली शिल्लक साहित्य दर्शविले जात नाही.

7) शालेय शिक्षण क्रिडा विभाग, परिपत्रक क्रमांक शापोअ 2004/155/04, दिनांक 31/03/2005 अन्वये इंधन मंजूरी व्यतिरिक्त आठवडयातून किमान एक वेळा अंडी, बिस्कीटे त्याचप्रमाणे कॅलशियम आयर्न गोळया देण्यांचा निर्देशाप्रमाणे पंचायत समिती, भुसावळ मधील कोणत्याच शाळेने नियमाचे पालन केल्याबाबत खात्री करता येत नाही.

8) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे प्रत्र क्रमांक प्राशिस/ शापोआ/2016/टंचाई भाग/ 5122/302, दिनांक 21/04/2016 अन्वये दुष्काळग्रस्त भागात सुटटीच्या कालावधीत विदयार्थ्यांना शालेय पोषण आहार पुरविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच तहसिलदार, भुसावळ यांचे प्रत्र क्रमांक जमीन 2 /कावी 328 /2016, दिनांक 05/03/2016 अन्वये दुष्काळग्रस्त गावांची यादी देउन दुष्काळग्रस्त भागात सुटटीच्या कालावधीत विदयार्थ्यांना शालेय पोषण आहार पुरविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तथापि, बहुतांष शाळांमध्ये सुटटीच्या कालावधीत विदयार्थ्यांना शालेय पोषण आहार पुरविण्यात आलेला नाही. याबाबत पंचायत समितीने तसंच संबधीत शाळांनी विदयार्थ्यांमध्ये पुरेशी जागृती केलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन पुरक पत्र क्रमांक शापोअ 2006/8201/06 प्रशि-4, दिनांक 11/09/2006 नुसार प्रती दिन विद्यार्थ्यांना उपस्थित असल्यांची संख्यानुसार विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे वाटप केल्याबाबत संबंधीत मुख्याध्यापकांचा अहवाल प्राप्त केला नाही.

10) दर दिवशी प्रती विद्यार्थी अन्नासाठी उपयोगात आलेल्या धान्यानुसार पोषण आहाराची मागणी करुन त्यानुसार पंचायत समितीने अनुदानाची रक्क्म प्रदान केल्याची पडताळणी करता आली नाही.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 29(4) नुसार रूपये 500/- वरील रक्कम प्रदान धनादेशाद्वारे करणे आवश्यक असतांना पंचायत समिती, चाळीसगाव येथे रोखीने दिली जाते.

12) देयकासोबत संयपाकी मदतनीस बचत गट यांची संख्या व पट संख्येनुसार त्यांना देंय मानधनाची अगणितीय आकडेवारी देण्यात येत नाही.

13) ग्रामसमिती अध्यक्षाची रोखपुस्तकात स्वाक्षरी घेतलेली जात नाही.

14) शहरी भागात किराणा बीले लावलेली नसतात. त्यामुळे प्रमाणानुसार वस्तु वापरली नाही, याचा बोध घेता येत नाही.

15) पुरक आहाराची छापील बीले वापरली जात नाही.

**4.84 शालेय पोषण आहार खर्चाबाबत.**

**पंचायत समिती रावेर, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 32) -** पंचायत समिती, रावेर येथील सन 2016-2017 च्या लेखापरिक्षणात शालेय पोषण आहार स्वयंपाकी मानधन वाटप प्रमाणकांची पडताळणी केली असता, शालेय पोषण आहार योजनेवरती रूपये 2,16,73,299/- ऐवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय शिक्षण क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2009/प्र.क्./ 1360/ क्र. 4/ दिनांक 18/06/2006 अन्वये शालेय पोषण आहार योजने अंतर्गत 1 ते 5 व 6 ते 8 च्या विद्यार्थ्यांना 450 उष्मांक व 20 ग्रॅम प्रथिनयुक्त दुपारचे जेवण द्यावयाचे आहे तसेच देण्यात येणाऱ्या आहारात उपरोक्त नमुद केलेप्रमाणे घटक आहेत, याची खात्री कण्यासाठी प्रयोगशाळेकडून तपासणी अहवाल प्राप्त करावयाचा आहे. तथापि, तसा चाचणी अहवाल घेतलेला नाही.

2) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक माअक-1009/ प्र.क्र. 36 /99/ विनियम, दिनांक 28/10/2004 अन्वये दुबार देयक प्रतिबंधक नोंदवही ठेवलेली नसल्याने दुबार प्रदानाची खात्री करता आली नाही

3) गटाने वित्तीय वर्षात उचललेल्या तांदुळ हिशोंबाची गटस्तरावरची नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, पुरक पत्र क्रमांक शापोआ 2006/8201/06 प्राशि-4, दिनांक 11/09/2006 नुसार प्रती दिन विद्यार्थ्यांना उपस्थिती असल्याची संख्येनुसार विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे पोषण आहार वाटप केल्याबाबत संबधीत मुख्याध्यापकांचा शाळा निहाय अहवाल प्राप्त करुन घेतलेला नाही.

**4.85 एम.एस.सी.आय.टी परीक्षा विहीत मुदतीत पास न झाल्याने शिक्षकांची वेतन निश्चिती करणेबाबत.**

**पंचायत समिती जामनेर, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 35 व 36)** पंचायत समिती, जामनेर शिक्षण विभागाकडील सेवापुस्तके तपासले असता बहुतांश कर्मचारी एम एस. सी. आय. टी. (MSCIT) ही संगणक अर्हता परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण न झाल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातस/नस्ती 04/224/39, दिनांक 05/05/2007 अन्वये शासकीय सेवेतील अ, ब व क मधील अधिकारी / कर्मचाऱ्यांनी संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण करुन शासनास प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दिनांक 31/12/2007 अंतिम मुदतवाढ देण्यात आली होती.

2) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सेप्रनि/2002/प्रक्र 14/02/12, दिनांक 02/09/2003 अन्वये वयाची 50 वर्ष पूर्ण केलेल्या शासकीय सेवकास संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करण्यापासून सुट देण्यात आलेली आहे. कर्मचाऱ्यांनी वयाची 50 वर्षे पूर्ण केलेली आहेत, त्यांना परिक्षा पास होण्यापासून सुट देणेबाबतचे आदेश सेवापुस्तकात नमूद असल्याचे आढळले नाही. लेखापरीक्षण अहवालात नमूद कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर कर्मचाऱ्यांनी शासन निर्णयाप्रमाणे विहीत मुदतीत संगणक अर्हता प्राप्त केली नसल्यास शासन निर्णयात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. पंचायत समिती, जामनेर लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक 35 नुसार रककम रुपये 24,50,673//- व परिच्छेद क्रमांक 36 नुसार रक्कम रूपये 19,46,145/- वसूल करावी.

**4.86 शालेय पोषण आहार खर्चाबाबत.**

**पंचायत समिती शेवगाव, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 29) -** शिक्षण विभागाकडील शालेय पोषण आहार योजने अंतर्गत रूपये 1,99,33,638/- अनुदान प्राप्त झालेले असून योजनेवर रूपये1,73,64,684/- खर्च झालेला आहे व रक्कम रूपये 25,68,954/- अखर्चित आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ 2015/प्र.क्र.177/एसडी-3 दिनांक 12/10/2015 नुसार दुपारचे जेवणात योजनेंतर्गत इयत्ता 1 ते 5 वीच्या विद्यार्थ्यांना 450 उष्मांक व 12 ग्रॅम प्रथिनेयुक्त व इयत्ता 6 ते 8 वीच्या विद्यार्थ्यांना 700 उष्मांक व 20 ग्रॅम प्रथिनेयुक्त आहारात घटक असणे आवश्यक आहे. तथापि, आहाराची प्रयोग शाळेकडून तपासणी अहवाल घेतलेला नाही. त्यामुळे शासन निर्णयानुसार विदयार्थ्यांना त्याच प्रमाणात आहार देण्यात आल्याची अचुकता प्रमाणित करता येत नाही.

2) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक म.आ.क्र./0099/प्र.क्र.36/99विनियम, दिनांक 28/10/2004 अन्वये दुबार देयके प्रतिबंधक नोंदवही ठेवलेली नसल्याने दुबारा प्रदानाची खात्री करता आली नाही

3) गटाने वित्तीय वर्षामध्ये उचलेल्या धान्यांच्या हिशोबाची गट स्तरावर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, पुरक पत्र क्रमांक शापोआ 2006/8201/06 प्र.शि.-4, दिनांक 11/09/2006 नुसार प्रती दिन विद्यार्थ्यांना उपस्थित असल्याची संख्यानुसार विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे वाटप केल्याबाबत संबधीत मुख्याध्यापकांचा अहवाल प्राप्त केलेला नाही.

5) दर दिवशी प्रती विद्यार्थी अन्नासाठी उपयोगात आलेल्या धान्यानुसार पोषण आहाराची मागणी करुन त्यानुसार पंचायत समितीने अनुदानाची रक्कम प्रदान केल्याची पडताळणी करता आली नाही

6) पंचायत समितीकडून शाळा स्तरावर वेळोवेळी भेटी देऊन शासन निर्णय क्रमांक शापोअ 2009 / प्र.क्र.136/ प्र.शि.-4, दिनांक 18/06/2009 मधील खर्चानुसार जमा असलेल्या पोषण आहाराचा पाहणी अहवाल नस्ती आढळून आली नाही.

7) प्राथमिक शाळेवर खिचडीसाठी लागणारी साहित्याची प्रत्येक महिन्यांत गोषवारा काढलेली शिल्लक साहित्य दर्शविले जात नाही.

8) ग्रामसमिती अध्यक्षांची रोखपुस्तकात स्वाक्षरी घेतली जात नाही.

9) शालेय शिक्षण क्रिडा विभाग, परिपत्रक क्रमांक शापोअ 2004/155/04, दिनांक 31/03/2005 अन्वये इंधन मंजूरी व्यतिरिक्त आठवडयातून किमान एक वेळा अंडी, बिस्कीटे त्याचप्रमाणे कॅलशियम आयर्न गोळया देण्यांचा निर्देशाप्रमाणे कोणत्याच शाळेने नियमाचे पालन केलेले नाही.

10) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 1002/प्रक्र128/आर्थोपाय, दिनांक 06/06/2008 नुसार शासनाने जिल्हा परिषदांना अखर्चीत निधी पुढील आर्थिक वर्ष अखेरपर्यंत करण्याची अनुमती दिलेली आहे. परंतू, पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहीलेला निधी शासनाकडे परत करणे बंधनकारक केलेले आहे. तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 1009 / प्र.क्र.66/ कोषा-प्र. 5, दिनांक 15/01/2010 नुसार शासकिय पैसा शासकिय लेख्याबाहेर ठेवण्यास प्रतीबंध केलेला आहे. तथापि, याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

### 4.87 M S C I T परीक्षा उत्तीर्ण नसतांना वेतनवाढी मंजूर केल्याने झालेल्या जादा प्रदानाबाबत.

**पंचायत समिती कोपरगाव, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती, कोपरगाव येथील शिक्षण विभागातील सन 2016-2017 चे लेखापरीक्षणावेळी निवडक सेवापुस्तकांची पडताळणी करतांना 65 शिक्षकांनी शासन धोरणाप्रमाणे संगणक हाताळणी व वापरापबाबतचे ज्ञान आवश्यक असणेबाबत एमएससीआयटी उत्तीर्ण नसतांना दिनांक 01/07/2008 ते परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंतच्या वेतनवाढी मंजूर करून अतिप्रदान केल्याचे निदर्शनास आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शासन निर्णय क्रमांक मागासे//नस्ती-4/224/39, दिनांक 05/07/2007 अन्वये दिनांक 19/03/2003 पूर्वी नियुक्त झालेले कर्मचारी यांना सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दिनांक 31/12/2007 ही शेवटची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यामुळे दिनांक 01/01/2008 पासून पुढे व वय वर्षे 50 पुर्ण होण्याच्या आत शासकीय कर्मचार्यांनी एमएससीआयटी संगणक परीक्षा तात्काळ उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अन्यथा दिनांक 01/01/2008 नंतर दिनांक 01/07/2008 व त्यापुढील दरवर्षीच्या नियत वेतनवाढी रोखणे आवश्यक आहे.

त्यामुळे वरील उपपरीच्छेदानुसार सदर शिक्षकांना दिनांक 31/12/2007 चे आत एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक होते. सदर कालावधीनंतर उशिराने एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण झाल्याने त्यांना दिनांक 01/07/2008 ते परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंतच्या वेतनवाढी मंजूर केल्याने रक्कम रूपये 60,24,263/- अतिप्रदान केल्याचे निदर्शनास आले.

### 4.88 पंचायत समिती, खेड शिक्षण विभाग (प्राथमिक) तालुका खेड सन 2004-2005 ते 2011-2012 या कालावधीत केलेल्या विषेश लेखापरिक्षण अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही न केलेबाबत.

**पंचायत समिती खेड, जिल्हा पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती, खेड सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात पंचायत समिती, खेड शिक्षण विभाग (प्राथमिक) तालुका खेड सन 2004-2005 ते 2011-2012 या कालावधीत केलेल्या विषेश लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेदाची पुर्ततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षण विभाग (प्राथमिक), पंचायत समिती खेड, तालुका खेड, जिल्हा पुणेचे सन 2004-2004 ते 2011-2012 या वित्तिय वर्षाच्या लेख्यांचे विषेश लेखापरिक्षण मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचे दिनांक 25/02/2013 व दिनांक 30/03/2013 चे प्रस्तावानुसार व संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे दिनांक 18/05/2013 चे आदेशानुसार सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा, पुणे कार्यालयाने शिक्षण विभाग (प्राथमिक), पंचायत समिती खेड, तालुका खेड, जिल्हा पुणेचे सन 2003-2004 ते 2011-2012 या वित्तिय वर्षाच्या लेख्यांचे विषेश लेखापरिक्षण पुर्ण करून सदर विषेश लेखापरिक्षण

अहवाल जावक क्रमांक स्था-2/ब-1/पंस.खेड/ शिक्षण विभाग(प्राथ.)/विषेश ले.प. अहवाल/04-12/पुणे-485, दिनांक 28/05/2014 अन्वये निर्गमित केलेला होता. त्या अहवालाच्या अनुषंगाने एकुण 10 परिच्छेदांची रक्कम रुपये 1,92,68,892/- गुंतलेली असुन त्यापैकी रक्कम रुपये 18,21,202/- तात्पुरती अमान्य व रक्कम रुपये 1,74,47,690/- अंतिम अमान्य करण्यात आली होती.

2) पंचायत समिती, खेड, शिक्षण(प्राथमिक) विभागाची सन 2004-2005 ते 2011-2012 या वर्षातील विषेश लेखापरिक्षण करण्यात आलेले होते. सदर अहवालाच्या अनुषंगाने प्राथमिक स्वरुपात आढळुन आलेली अफ़रातफ़र प्रथमत: निदर्शनास आल्यानंतर मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम 53 परिशिष्ट 20 व नियम 148 परिशिष्ट 19 नुसार व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 36(1) व (2) नुसार सदर प्रकरणाची पुर्णपणे चौकशी करण्यात येऊन अफ़रातफ़र करण्यात आलेल्या एकुण रक्कमेची ज्या पध्दतीने अपहारीत करणेत आलेली असेल, ती पद्धत, अपहारीत रक्कम वसुली व अनुषंगिक उचित कारवाई तसेच अशा प्रकारे अफ़रातफ़रीस प्रतिबंध करण्यासाठी योजलेले उपाय यांच्या सह संपुर्ण अहवाल विभागीय आयुक्त व संविधिक लेखापरिक्षक यांना कळविणे आवश्यक आहे. सदर आक्षेपांबाबत पंचायत समितीने सदर अपहारीत, अंतिम व तात्पुरत्या अमान्य असलेल्या रक्कमाबाबत वसुली व मुंबई वित्तिय नियम 1959 अंतर्गत कार्यवाही करुन स्थानिक निधी लेखापरिक्षा विभागास कळविले नाही. तरी सदरबाबत कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबत तात्काळ अवगत करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

**4.89 संगणक अहर्ता एमएस सी. आय.टी परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण नसताना वेतन वाढी अदा केलेबाबत**

**पंचायत समिती शिरुर, जिल्हा पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती, शिरूरचे सन 2016-2017 चे लेखापरिक्षणात शिक्षण विभागाकडील सेवापुस्तकाची तपासणी केली असता सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार संगणक अहर्ता एमएस सी.आय.टी परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण नसताना वेतन वाढी अदा केलेल्या आहेत. सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 17 दिनांक 18/09/2017 अन्वये विचारणा करण्यात आली होती. त्यास उत्तर प्राप्त न झालेने सदरबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे.

1) शिक्षण विभागाकडील कार्यरत असणाऱ्या उपशिक्षक / मुख्याध्यापक / केंद्रप्रमुख / पदवीधर यांचे सेवापुस्तकांची पडताळणी केली असता, कर्मचारी संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आलेली नाही. सदरबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक मानेस/नस्ती-4/224/39, दिनांक 05/05/2007 अन्वये गट अ, ब, क मधील अधिकारी / कर्मचारी यांना संगणक परीक्षा दिनांक 31/12/2007 पर्यंत उत्तीर्ण होणे आवश्यक असून सदर कर्मचारी दिनांक 31/12/2007 पर्यंत संगणक परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्याच्या पुढील वार्षिक वेतन वाढी देण्यास निर्बंध घातलेले असल्याने पंचायत समितीमध्ये उपरोक्त कालावधीपर्यंत एम.एस.सी.आय.टी परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या कर्मचाऱ्यांना अदा केलेली जादा वेतन रक्कम रुपये 15,87,095/- वसुलात आणून पूर्तता केल्याचे लेखापरीक्षणास दाखवावी

**4.90 शाळांना नवीन एल पी जी जोडणी अनुदान वाटप करणे बाबत.**

**पंचायत समिती शिरुर, जिल्हा पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती, शिरुर चे सन 2016-2017 चे लेखापरिक्षणात शिक्षण विभागाकडील शालेय पोषण आहार योजनांतर्गत शासन निधीतून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या आदेश क्रमांक शिक्षण जिप/प्राथ/शापोआ 236/17 दिनांक 29/03/2017 अन्वये शाळांना नवीन gas कनेक्शन साहित्यकरीता सन 2014-2015 चे एल पी जी केंद्र हिस्सा अनुदानातून gas कनेक्शन नसलेल्या शाळाना नवीन gas घेणेसाठी शिक्षण उपसंचालक (प्राथमिक) यांचे पत्रात नमूद केलेनुसार 1. प्रती सिलेंडर दर रूपये 1,450/- दोन सिलेंडरकरीता रूपये 2,900/-, रेग्युलेटरकरीता रूपये 150/- व नळी रूपये 190/- व डोक्युमेंत व कार्डकरीता रूपये 100/- चार्जेस या दराप्रमाणे शाळांना अनुदान वितरीत करण्याचे आदेशीत केलेले आहे. सदर कामी 316 शाळांना 2 gas सिलेंडर करीता रूपये 10,55,440/- अनुदान वितरीत केलेले आहे. पंचायत समितीने गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती, शिरूर यांचे जाक्र/प्रशा/44/2017, दिनांक 20/03/2017

अन्वये रूपये 6,88,010/- अनुदान वितरीत केले आहे. सदर खर्च प्रमाणके व नस्तीची तपासणी केली असता सदरबाबत प्रमाणक क्रमांक 170, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 6,88,010/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 25 केंद्र व नगर परिषद शाळाकडील सदर अनुदान वाटप केलेल्या शाळांकडे सदर कालावधीतील MIS पोर्टल वरील माहितीनुसार gas कनेक्शन असताना वरील अनुदान काय आधारे वाटप केले? याबाबत खुलासा करावा.

10 शाळांचे प्रती शाळा रक्कम रुपये 3,340/- प्रमाणे रक्कम रुपये 33,400/- वसूल करून शासन निधीत भरणा करण्यात यावे. तसेच अनुदान वाटप केलेल्या इतर शाळांकडे पूर्वी gas कनेक्शन नाही. याबाबत MIS पोर्टलवरील शालेय पोषण आहार संबधीच्या अज्ञावलीमध्ये भरलेल्या माहितीच्या आधारे ताळमेळ घेऊन खात्री करण्यात यावी.

2) अनुदान प्राप्त शाळांनी gas कनेक्शन घेतल्या बाबतचे एलपीजी जोडणी प्रमाणपत्र व एलपीजी पुस्तिका लेखापरीक्षणास दर्शवावे अन्यथा सदर अनुदान शासन सदरी भरणा करून पूर्तता दर्शवावी

3) सदर योजनेचे अखर्चित अनुदान रक्कम 3,67,430/- शासन निधीत भरणा करणेत यावी.

### 4.91 संगणक परीक्षा उत्तीर्ण नसलेने झालेल्या जादा अदाईबाबत (शिक्षण विभाग)

**पंचायत समिती बारामती, जिल्हा पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, बारामती सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात प्राथमिक शिक्षण विभागाकडील कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांची तपासणी केली असता एम.एस.सी.आय.टी. (संगणक) अर्हता विहीत मुदतीत धारण न केल्याने झालेल्या जादा वेतन अदाईबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक 2000/प्र.क्र.5/2001/39, दिनांक 20/07/2002 नुसार संगणक अर्हता परीक्षा एम.एस.सी.आय.टी विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक होते. तसेच महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक सेप्रनि2002/प्र.क्र.14/02/12 दिनांक 02/09/2003 अन्वये वयाची 50 वर्षे पूर्ण केलेल्या शासकीय कर्मचा-यांस संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट देणेत येत आहे व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमाक मातंस/नस्ती04/224/39, दिनांक 05/05/2007 नुसार मुदतवाढ देणेत आली आहे. त्यानंतर संगणक अर्हता धारण करणा-या कर्मचा-यांच्या वेतनावाढ रोखणेत याव्यात, असे आदेश असतांना खालीलप्रमाणे कर्मचा-यांनी विहीत मुदतीत संगणक अर्हता एम.एस.सी.आय.टी. परीक्षा अथवा उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमूद केलेप्रमाणे तत्सम संगणक अर्हता धारण केलेली नाही. असे असतांना दिनांक 01/01/2008 पासून सदर कर्मचा-याच्या वेतनवाढी रोखणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही न कलेने रक्कम रुपये 24,86,803/- जादा वेतन अदा झाले आहे. सदर जादा वेतन वसूल करुन शासन खाती भरणा करावे.

### 4.92 शिक्षण विभागातील कार्यरत असणा-या शिक्षकांना दिर्घकालीन सुटटी असताना वाहतुक भत्ता अदा केलेबाबत

**पंचायत समिती वेल्हा, जिल्हा पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती, वेल्हे शिक्षण विभागाकडील वेतन देयकांची व पुरवणी देयकांची तपासणी करताना शिक्षकांना दिर्घकालीन सुटटी, प्रसुती रजेवर, बीएड शैक्षणिक रजेवर असताना त्यांना 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 73,800/- वाहतुक भत्ता अदा केलेला आहे. सदर रक्कम वसूल करावी.

### 4.93 केंद्र प्रमुख व मुख्याध्यापकांकडील किर्दीवरील शिल्लक अखर्चित रकमांबाबत.

**पंचायत समिती कराड, जिल्हा सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 36) -** पंचायत समिती, कराड सन 2016-2017 मध्ये शिक्षण विभागाअंतर्गत असलेल्या केंद्र शाळा अधिनस्त प्राथमिक शाळांकडील लेख्यांची पडताळणी केली असता, त्यामध्ये वित्तीय वर्षाअखेर अखर्चित रकमा दिसून आल्या. तसेच शालार्थ किर्दीवर कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेल्या आयकर रकमा थेट शासनास भरणा न करता एस.एस. असोसिएशन टॅक्स

इन्व्हेसमेंट कन्सलटंट, शाखा कराड यांच्याकडे भरणा केलेल्या दिसून आल्या. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 40 प्राथमिक शाळांच्या किर्दीवरील जमा व्याज, अखर्चित रकमा, आयकर रकमा शासनास भरणा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झालेली नाही.

अ) उपरोक्त तपशिल पहाता 4 टक्के सादील तसेच शालेय पोषण आहार पासबुकास व किर्दीस जमा असणाऱ्या व्याजाच्या रकमा व दिर्घ कालीन अखर्चित अनुदानाच्या रकमा शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

ब) कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेल्या आयकराच्या रकमा शासनास भरणा केल्या असल्याबाबत शासकीय नमुन्यातील चलन दप्तरी नाही. प्रस्तुत प्रकरणी प्रत्येक शाळेकडील आयकर भरणा प्रत्यक्षात स्वत: भरणा न करता एस.एस. असोसिएशन टॅक्स इन्वहेसमेंट कन्सलटंट शाखा कराड यांच्याकडे भरणा केला जातो. परंतू, सदर भरणा रकमेचे चलन प्राप्त करुन भरणा रकमेची पुर्तता सादर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे एल.आय.सी. भरणा चलनाची पोहोच दप्तरी ठेवणे आवश्यक आहे.

क) केंद्र वाठारकडे केंद्र प्रमुख खातेवर 31/03/2017 अखेर रुपये 70,622/- एवढी शिल्लक असून त्याचा तपशिल खाते शिल्लक रुपये 450/-, चव्हाण रजा रूपये 3,140/-, वरात नसलेले रुपये 20,400/-, मुख्यमंत्री सहाय्यता निधी रुपये 36,897/-, वरात नसलेने रुपये 9,735/-, अशा मोठया प्रमाणात रकमा शिल्लक आहेत. सदर रकमा शासनास भरणा केल्याची पुर्तता दाखवावी.

याबाबत सर्व केंद्र प्रमुख शिक्षण विस्तार अधिकारी व गट शिक्षण अधिकारी यांनी केंद्र प्रमुख व मुख्याध्यापक यांच्याकडील खात्यावर दिर्घ काळ प्रलंबित रकमांबाबत आढावा घेऊन अशा अखर्चित रकमा शासनास भरणा केल्याबाबत अनुपालन पुर्तता सादर करणे आवश्यक आहे.

**4.94 दुष्काळग्रस्त भागातून येणाऱ्या विद्यार्थिनींच्या एस.टी. पाससाठी आर्थिक सवलत देणेबाबत.**

**पंचायत समिती खानापूर विटा, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 22) -** पंचायत समिती खानापूर कडील दुष्काळग्रस्त भागातून येणाऱ्या विद्यार्थिनींच्या एसटी. पाससाठी आर्थिक सवलत देणे या कामाकरिता रक्कम रूपये 1,72,104/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त शाळा/कॉलेज मधील एकूण 186 लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे. परंतु, साक्षांकित पोहच मात्र फक्त मातोश्री वेणूताई चव्हाण कॉलेज, खानापूर मधील एकूण 53 लाभार्थीची आहे. त्यामुळे उर्वरित लाभार्थीना लाभ मिळाल्याची खात्री करता आली नाही.

2) मातोश्री वेणूताई चव्हाण कॉलेज, खानापूर व शेठ च.ग.शहा विद्यामंदिर, लेंगरे या दोन शाळा/कॉलेजचेच उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे. त्यामुळे इतर शाळा/कॉलेज मधील लाभार्थींना लाभ मिळाला किंवा नाही, याची खात्री होत नाही.

3) मातोश्री वेणूताई चव्हाण कॉलेज, खानापूर यांच्या उपयोगिता प्रमाणपत्रावर दिनांक 29/12/2016 तर शेठ च.ग.शहा विद्यामंदिर, लेंगरे यांच्या उपयोगिता प्रमाणपत्रावर दिनांक 28/09/2016 नमूद आहे. परंतु, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सांगली यांच्या सूचनांप्रमाणे उपयोगिता प्रमाणपत्र हे दिनांक 07/09/2016 पर्यंत सादर करावयाचे होते. त्याप्रमाणे पंचायत समितीनेसुद्धा दिनांक 07/09/2016 ला उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे. यावरून लाभार्थ्यांचे उपयोगिता प्रमाणपत्र नसताना पंचायत समिती, शिक्षण विभाग यांनी कशाच्या आधारे उपयोगिता प्रमाणपत्र दिले? याचा खुलासा करावा.

4) एकूण 186 लाभार्थीपैकी फक्त 137 लाभार्थीचे बँक खाते नंबर नस्तीसोबत दिसून आले. त्यामुळे 49 लाभार्थीचे बँक खाते आहे अथवा नाही किंवा त्यांना लाभ मिळाला का नाही? याबाबत खात्री करता आली नाही.

5) विद्यार्थिनींनी कोठून कोठे प्रवास केला? याबाबत काहीच माहिती मिळत नाही. तसेच विद्यार्थिनी कोणत्या गावच्या राहिवाशी आहेत? त्या गावचा रहिवाशी दाखला उपलब्ध नसल्याने साशंकता निर्माण होते.

**4.95 शिक्षण विभागाकडील कर्मचा-यांच्या संगणक अर्हता प्रमाणपत्राबाबत.**

**पंचायत समिती जत, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती जतच्या सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात शिक्षण विभागाकडील शिक्षकांच्या सेवापुस्तकांची तपासणी केली असता, शिक्षक संगणक अर्हता प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण/सूट नसलेचे किंवा विलंबाने उत्तीर्ण झालेचे तसेच सेवापुस्तकात नोंद नसलेचे आढळून आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षकांच्या सेवापुस्तकात संगणक अर्हता प्रमाणपत्राची नोंद आढळून आली नाही किंवा काही शिक्षक विलंबाने (31/12/2007 नंतर) संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. जे शिक्षक अदयाप संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झालेले नाहीत, त्यांची वेतनवाढ रोखल्याची खात्री करावी व जे शिक्षक विलंबाने संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत, त्यांची वेतनवाढ रोखण्यात आलेली नसेल, तर दिनांक 01/01/2008 पासून संगणक अर्हता प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण किंवा सूट मिळालेच्या तारखेपर्यंतच्या कालावधीत जादा प्रदान झालेली वेतनाची रक्कम परिगणित करून शासन भरणा करून पुर्तता सादर करावी.

**4.96 संगणक अर्हता परिक्षेचे प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न करता वेतनवाढी अदा केल्याबाबत.**

**पंचायत समिती पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती, पन्हाळा यांचेकडील सन 2016-2017 या लेखापरीक्षण कालावधीमध्ये शिक्षण विभाग यांचेकडील सेवापुस्तकाचे लेखापरीक्षण केले असता, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती-4/224/39, दिनांक 05/05/2007 अन्वये ज्यांची निवड प्रक्रिया दिनांक 01/01/2001 रोजी किंवा त्यापूर्वी पासून सुरु झालेली आहे अशा शासकीय अधिकारी / कर्मचा-यांनी नियुक्तीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत तसेच सध्या शासकीय सेवेत कार्यरत असलेले अधिकारी / कर्मचा-यांनी दिनांक 31/12/2002 पूर्वी परिक्षा उत्तीर्ण न केल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी उक्त कालावधी समाप्त झाल्यानंतर परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यांना सूट देण्यात येईपर्यंतच्या कालावधीपर्यत किंवा ते संगणक हाताळणी/वापराबाबतचे विहित प्रमाणपत्र उपलब्ध करून देईपर्यत वेतनवाढी रोखण्यास पात्र ठरतील व वेतनवाढी रोखून धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा त्यांना हक्क असणार नाही, असे नमुद केलेले आहे. 5 कर्मचारी विहीत मुदतीत संगणक अर्हता परिक्षा पास न झालेने त्यांना अदा करणेत आलेली र्क्कम रूपये 8,04,086/- वसूल करावी.

कर्मचा-यांच्या वेतनातून वसूलपात्र रक्कम वसुल करण्यात यावी सदरचे लेखापरीक्षण हे चाचणी लेखापरीक्षण असून काही निवडक सेवापुस्तके सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणा दरम्यान तपासण्यात आलेली आहेत. तथापि, उर्वरीत सर्व सेवापुस्तकांची छाननी करून वर नमुद केलेल्या नियमानुसार संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या कर्मचा-यांची वेतनवाढी अदा न करता अदा करण्यात आलेली रक्कम वसूल करण्यात यावी.

**4.97 स्थलांतरित कुटुंबातील बालकांना नियमित शाळेमार्फत शिक्षणाची सुविधा उपलब्ध होणेकरीता वाहतुकीवरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती शिरोळ, जिल्हा कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** स्थलांतरित कुटुंबातील बालकांना नियमित शाळेमार्फत शिक्षणाची सुविधा उपलब्ध होणेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्रमांक कोजिप/शिक्षण/सशीअ/1553-60/शिक्षण विभाग, जिल्हा परिषद दिनांक 31/03/2017 अन्वये जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त निधीतून शिरोळ गटास प्रती विद्यार्थी प्रती महा 300/- रुपये प्रमाणे उदगाव व चिंचवड येथील वीटभट्ट्यावरील 132 स्थलांतरित बालकांच्या वाहतुकीवरील खर्च भागवण्याकरीता माहे फेब्रुवारी 2017 ते एप्रिल 2017 या तीन महिन्यांकरिता रूपये 1,18,800/- रक्कम वितरीत केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक 1010/प्र.क्र.68/कोष/प्र.05, दिनांक 18/04/2011 अन्वये शासकीय योजनेचे लाभ NEFT द्वारे थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्याचे आदेश दिले असताना याप्रकरणी रक्कम शाळेच्या खात्यावर जमा केली आहे.

2) महिना पूर्ण होण्यापूर्वी माहे एप्रिल 2017 करीता वाहतुकीची रक्कम नियमबाह्य प्रदान केली आहे.

3) वीटभट्टीपासून शाळेपर्यंत विद्यार्थ्यांची वाहतूकसाठी कोणत्या वाहनाची उपाययोजना शिक्षण विभागाने केली, ते स्पष्ट केलेले नाही.

4) वरीलप्रमाणे शाळांना वितरीत रक्कम विद्यार्थी उपस्थितीच्या प्रमाणात विद्यार्थ्यांना वाटप केलेबाबत व रक्कम विद्यार्थ्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांच्या पोच व उपयोगिता प्रमाणपत्रे सादर केलेली नाहीत.

**4.98 संगणक अर्हता परिक्षेचे प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न करता वेतनवाढी अदा केल्याबाबत.**

**पंचायत समिती भुदरगड, जिल्हा कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती, भुदरगड यांचेकडील सन 2016-2017 या लेखापरीक्षण कालावधीमध्ये शिक्षण विभाग यांचेकडील सेवापुस्तकाचे लेखापरीक्षण केले असता, 3 कर्मचा-यांनी संगणक अर्हता परिक्षेचे प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न करुनही त्यांना वेतनवाढी अदा केलेल्या आहेत. याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 48, दिनांक 31/10/2017 देण्यात आले होते. परंतू, त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंसे /नस्ती 04/224/39, दिनांक 05/05/2007 अन्वये शासकीय सेवेतील गट अ, गट ब, गट क मधील अधिकारी / कर्मचा-यांनी संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण करून शासनास प्रमाणपत्र सादर करण्याची दिनांक 31/12/2007 ही अंतिम मुदतवाढ समजण्यात येईल, असे नमुद केलेले आहे. सदर कर्मचारी विहीत मुदतीत संगणक अर्हता परिक्षा पास झाले नसलेने त्यांना अदा केलेली रक्कम रूपये 71,385/- कर्मचा-यांच्या वेतनातून वसुल करण्यात यावी. सदरचे लेखापरीक्षण हे चाचणी लेखापरीक्षण असून काही निवडक सेवा पुस्तके सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणा दरम्यान तपासण्यात आलेली आहेत. तथापि, उर्वरीत सर्व सेवापुस्तकांची छाननी करून वर नमुद केलेल्या नियमानुसार संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या कर्मचाऱ्यांची वेतनवाढी अदा न करता अदा करण्यात आलेली रक्कम वसूल करण्यात यावी.

**4.99 शिक्षकांना संगणक अर्हता चाचणी परीक्षा उत्तीर्ण नसतांना शिक्षकांना वेतनवाढी चालू ठेवल्याबाबत.**

**पंचायत समिती सांगोला, जिल्हा सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, सांगोलाच्या शिक्षण विभागाकडील सेवापुस्तके तपासली असता खालील तपशिलात नमूद शिक्षक हे दिनांक 31/12/2007 मुदतीत संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाले नाहीत. तपशिलात नमुद केल्याप्रमाणे विहित मुदती नंतरही अदयाप उत्तीर्ण नाहीत / विहित मूदतीनंतर संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यांना दिनांक 01/07/2008 ते संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकादरम्यान जादा वेतन प्रदान झाले आहे आणि होत आहे. तरी एकूण रक्कम रुपये 41,30,328/- वसूली करणेत येवून अनुपालन करावे.

2) आक्षेपातील नमुद कर्मचा-यांची नांवे चाचणी लेखापरिक्षणांत आढळले असून पंचायत समिती, सांगोलाकडील सर्व कर्मचा-यांची सेवापुस्तके तपासून जे कर्मचारी संगणक अर्हता चाचणी परीक्षा अदयाप उत्तीर्ण नाहीत किंवा उशीरा उत्तीर्ण झाले आाहेत, त्यांना होत असलेले अतिप्रदान रोखावे व अतिप्रदान रक्कमेची गणना करुन वसुलीची कार्यवाही करुन अनुपालन करावे.

3) एकूण 613 शिक्षक जे दिनांक 31/12/2007 नंतर संगणक चाचणी परीक्षा उत्तीर्ण झाले आहे. परंतु त्याची दिनांक 01/07/2008 ते परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या कालावधीपर्यंत जादा प्रदान रकमेची वसुली करणे आवश्यक आहे.

4) एकूण 244 शिक्षक हे संगणक चाचणी परीक्षा केव्हा उत्तीर्ण झाले? याच्या नोंदी सेवापुस्तकांत नाहीत. वरीलप्रमाणे यांनाही जादा प्रदान होत आहे. 244 शिक्षक केव्हा उत्तीर्ण झाले? याबाबत सेवापुस्तकांत नोंदी घेवून

दिनांक 01/07/2008 पासून संगणक चाचणी परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या कालावधीपर्यंत त्याची वसुली करणे आवश्यक आहे.

5) एकूण 37 शिक्षकांपैकी 20 शिक्षक संगणक चाचणी परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत, अशा नोंदी आहेत. परंतु, केव्हा उत्तीर्ण? याचा तपशिल नाही. याबाबत त्यांचे संगणक चाचणी परीक्षा प्रमाणपत्र तपासून दिनांक 01/07/2008 ते संगणक चाचणी परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत वसुली करणेत यावे. तसेच 17 शिक्षक संगणक चाचणी परीक्षा उत्तीर्ण झाले नाही, अशा नोंदी आहेत. त्यांचे बाबतीत दिनांक 01/07/2008 ते अदयापर्यंत कालावधीचे जादा प्रदान रकमेची वसुली करणे आवश्यक आहे.

**4.100 पटसंख्येनुसार शिक्षक निश्चिती व अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन न केलेबाबत.**

**पंचायत समिती माळशिरस, जिल्हा सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिपाय आहेत.

पंचायत समिती, माळशिरस शिक्षण विभागाचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षण कालावधीत शिक्षण विभागाकडील शिक्षण उपसंचालक, पुणे यांनी मंजूर केलेली शिक्षकांची मंजूर आस्थापना सूची व शिक्षक निश्चिती दप्तराची तपासणी केली असतां सन 2016-2017 मधील आस्थापना सूचीनूसार दिनांक 30/09/2016 चे पटसंख्येच्या आधारे केलेली शिक्षक निश्चिती व प्रत्यक्ष शाळांमधील कार्यरत असलेले शिक्षक याबाबतची पडताळणी केली असतां एकूण 08 केंद्राकडील आस्थापना सूचीमध्ये नमूद केलेनुसार एकूण 13 अतिरिक्त शिक्षक असल्याचे आढळून आलेले आहे. तरी शिक्षण विभागाकडील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाबाबत महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक जिपदा/511/प्र.क्र.54/आर-14, दिनांक 12/05/2011 नुसार अनुक्रमांक 9 मध्ये नमूद केलेनुसार समायोजन करतांना दरवर्षी 30 सप्टेंबर अखेरच्या शाळानिहाय विदयार्थी पटसंख्येच्या माहितीनुसार अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन ऑक्टोबरअखेर करणेबाबत सूचित केलेले आहे. परंतु, गट शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, माळशिरस यांनी सदरचे अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन चार महिने उशिराने म्हणजे माहे डिसेंबर 2016 मध्ये केले असल्याचे दिसून येते. सदरच्या अतिरिक्त शिक्षकांचे वेळीच समायोजन करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न केल्याने अतिरिक्त ठरलेल्या 13 शिक्षकांना माहे सप्टेंबर 2016 ते डिसेंबर 2016 या कालावधीत सरासरी खालीलप्रमाणे प्रती महिना प्रती शिक्षक वेतन रूपये 48,287/- x 13 शिक्षक x 04 महिने = रूपये 25,10,924/- एवढे वेतन संबंधीत शाळांकडे सदरच्या शिक्षकांस अतिरिक्त ठरल्याने त्या शाळेत कार्यरत ठेऊन वेतन अदा केले असल्याने सदरचा खर्च नियमबाहय झाला आहे. सदरची बाब गंभीर व नियमबाहय स्वरुपाची आहे.

**4.101 शालेय पोषण आहार खर्चातील अनियमितता**

**पंचायत समिती बार्शिटाकळी, जिल्हा अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 25) -** निवडक महिन्याचे प्रमाणक तपासणी केली असता खालील अनियमितता आढळुन आल्यात तरी इतर महिन्यात अशाच अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही. निवडक महिन्यातील दोन प्रमाणकान्वये शालेय पोषण आहार योजनेवर रक्कम रूपये 1,86,300/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांचे शालेय पोषण आहार संबंधी दिलेल्या वेळोवेळी भेटीनुसार अहवाल उपलब्ध झाला नाही.

2) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ 2010/प्र.क्र.18/प्राशि-4, दिनांक 02/02/2011 अन्वये शालेय पोषण आहारच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 06 अन्वये दैनिक आहारात नियमितपणे पालक, मेथी, टोमॅटो, कोथिंबीर, बटाटे, राजगीरा, फ्लॉवर, कोबी, वटाणा, शेवगा, वांगी, दुधीभोपळा, वाल, तोंडाले, गाजर इत्यादी पाककृतीनुसार आहार शिजवण्याचे काम करण्याच्या स्थानिक यंत्रणेने खरेदी कराव्यात आणि त्याचा आहारात समावेश करावा. स्थानिक यंत्रणेने चविष्ट आहार बनविण्याचे काम करावे. तसेच त्यामध्ये भाजीपाल्याचा समावेश न चुकता करावा. सबंधित मुख्याध्यापकाने प्रत्येक महिन्याला आहारामध्ये आवश्यक भाजीपाल्याचा समावेश केला असल्याचे तसेच आहार चविष्ट असल्याचे खात्री करून आहार शिजविण्याच्या

यंत्रणेस प्रमाणपत्र द्यावे. सदर प्रमाणपत्राच्या आधारे सबंधित यंत्रणेस खर्च अदा करण्याची कार्यवाही करावी. करिता मुख्याध्यापकाचे शाळा निहाय प्रमाणपत्र पंचायत समितीकडे उपलब्ध नाहीत.

3) पंचायत समिती अंतर्गत निवडक शाळाच्या अभिलेख्यांची तपासणी केली असता अन्न शिजविण्याचे मानधन व किराणा साहित्य खरेदीचे प्रदान धनादेशाऐवजी रोखीने केल्याचे आढळुन आले. महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखासंहिता 1968 चे नियम 25(1) चे पालन झाले नाही.

4) प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्रमांक शापोआ/05-06/ प्राशि/302/9662, दिनांक 09/08/2005 नुसार अन्न शिजविण्यासाठी देय असलेल्या अनुदानातुन 75 टक्के खर्च हा पुरक पदार्थावर व 25 टक्के इंधन व मजुरीवर खर्च करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झाल्याचे पडताळणी होऊ शकली नाही.

5) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ/2004/246/04, दिनांक 31/03/2005 नुसार ग्रामस्थ समिती निर्माण करून आठवडयातुन एक वेळा सभा घेऊन विदयार्थ्यांना जेवण देण्यापुर्वी अर्धा तास आधी जेवणाची प्रत तपासणे आवश्यक आहे. तशा प्रकारचा अहवाल उपलब्ध न झाल्याने वरीलप्रमाणे कार्यवाही झाल्याची खात्री पटत नाही.

6) शालेय व क्रिडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक शापोआ/2010/प्र.क्र./383/प्रा शि-4, दिनांक 26/02/2010 सुचनांचे काटेकोरपणे अंमलबजावणी झाली नाही. परि. क्रमांक इ (1) अन्न शिजवुन देणाऱ्या व्यक्तीचे वैदयकीय प्रमाणपत्र ठेवणे आवश्यक आहे व परि. क्रमांक इ (4) नुसार क्षेत्रीय अधिकारे यांनी वेळोवेळी आहाराचा दर्जा तपासणी करणे आवश्यक आहे. तशा प्रकारचे अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

7) परि. क्रमांक इ (2) योजनेअंतर्गत पाच विदयार्थ्यांच्या पालकांना नियंत्रीत सदस्य घेण्याबाबत सुचीत केले आहे. त्याबाबत अहवाल उपलब्ध झाले नाहीत.

8) परि. क्रमांक ग नुसार अभिप्राय पुस्तिका ठेवुन आहाराच्या दर्जाबाबत वेळोवेळी ग्राम समस्त समिती, सदस्य, पालक यांचे अभिप्राय घेण्याबाबत कार्यवाही केलेली नाही.

9) दिनांक 02/02/2011 च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 09 अन्वये महिला बचत गट स्वयंसेवी संस्था याची अन्य शिजविणेकरीता निवड शालेय व्यवस्थापन समितीने केली असल्याबाबत व त्याला ग्रामविकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.472/वित्त9(33), दिनांक 09/02/2009 अन्वये ग्रामसभेच्या संमतीने केल्याबाबत अधिकृत दस्तऐवज नस्तीत उपलब्ध नाहीत.

10) संबंधीत शाळेतील मुख्याध्यापक यांचे शालेय पोषण आहार संबंधीत उपयोगीता प्रमाणपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

**4.102 पंचायत समिती अंतर्गत शाळांतील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती मुर्तिजापूर, जिल्हा अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 24) -** पंचायत समिती, मुर्तिजापुर येथील सन 2016-2017 या वित्तिय वर्षात काही निवडक शाळेच्या शालेय पोषण आहार व शिष्यवृत्तीच्या लेख्याची लेखापरीक्षण केले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद शाळा 1) हातगांव 2) सालववाडा 3) हिरपूर 4) कुरुम 5) बपोरी 6) कंझरा शाळा व इतर निवडक शाळेची रोख पुस्तके, प्रमाणके, बँक बुक, शालेय व्यवस्थापन समिती, सभा नोंदवही इत्यादी लेख्यांची तपासणी केली असता महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई 2010/ प्रक्र.217/प्राशि1, दिनांक 17/06/2010 अन्वये प्रत्येक शाळेकरीता एक शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना करुन त्यांना विश्वासात घेवून, आर्थिक व्यवहार शाळेच्या मुख्याध्यापकाने करावे, असे शासनाचे आदेश आहेत. परंतु, खर्च करण्यापुर्वी व खर्च झाल्यानंतर नियमाप्रमाणे नियमित ठराव संमत केलेले नाहीत. खर्चास मंजु-या घेतलेल्या नाही.

2) मुलांना अन्न शिजविण्याच्या यंत्रणेने आठवड्यातून किमान एक दिवस पुरक आहार द्यावा, असे आदेशित आहे. त्याला अनुसरुन पंचायत समिती स्तरावरून कार्यवाही करणेकरीता शाळा मुख्याध्यापकास आदेशित केल्यानुसार मुलांना पूरक आहार व खिचडीत भाजीपाला टाकल्याबद्दल शाळास्तरावर दैनिक साठा नोंदवही उपलब्ध न

झाल्याने पडताळता आल्या नाहीत. तसेच नियमानुसार आठवड्यातून एक दिवस पुरक आहार दिल्याबाबत शाळेचे अहवाल लेखापरिक्षणात मिळाले नाहीत.

3) प्रत्येक प्रमाणकाच्या प्रदानासंबंधी त्या साहित्याची नोंद माल पुस्तकात किती क्रमांकाच्या पानावर घेतली? साहित्य कोणी आणले? रकमा कोणी अदा केल्या? याबाबत प्रमाणपत्र नोंदवून व साहित्याच्या विल्हेवाटीला अनुसरून शाळेतील शिक्षकांना व खिचडी शिजविणा-या मदतनीसाला दिलेल्या साहित्याबाबत स्वाक्षरी घेऊन प्रमाणित केले नाही.

4) शाळेतील जंगम माल पुस्तक अद्यावत वर्षेवार तपशिलवार नोंदी घेवून सर्व जंग्म मालमत्ता अद्यावत असल्याबद्दल अध्यक्षांच्या स्वाक्षरीने 30 जून रोजी संपणा-या प्रत्येक वर्षी तसे प्रमाणपत्र नोंदवून प्रमाणित केले नाही. तसेच सर्वच शाळेनी जंगम मालमत्त्ता नोंदवही ठेवल्याचे अनुपालन दर्शवावे.

5) शाळेंनी साहित्य खरेदी करण्यात आले असून सदर साहित्य साठा पुस्तकात नोंद केली नाही. त्यामुळे साहित्य खरेदी केल्याबाबत सत्यता पडताळता येत नाही. सदर साहित्य खरेदी योग्य असल्याबाबत अनुपालन दर्शवावे.

6) तपासणी केलेल्या शाळेपैकी कोणत्याही शाळेने वर्षाच्या शेवटी वार्षिक जमा व खर्चाचा योजनानिहाय अहवाल तयार करुन त्यास शालेय व्यवस्थापन समितीची मंजुरी घेतली नाही.

7) प्राथमिक शाळा, कुरुम येथील सादील रजिस्टर व पासबुकाची तपासणी केली असता सदर रोखपुस्तकात दिनांक 31/03/2017 रोजी शिल्लक रक्कम रुपये 88,364/- असून सदरबाबत संबधीतांना विचारणा केली असता योग्य तो खुलासा लेखापरीक्षणास सादर केला नाही. सदर रक्कमेबाबत तपासणी करुन सदर अखर्चीत रक्कम शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद विकास सेवा (वर्तणूक) नियम 1967 चे नियम 3 प्रमाणे विस्तार अधिकारी (शिक्षण) यांनी शाळेचे वित्तीय लेख्याची तपासणी करुन प्रमाणित केले नाहीत. तसेच विस्तार अधिकारी यांच्या दौरा दैनंदिनी लेखापरीक्षकांनी अर्धसमास पत्र क्रमांक 05 दिनांक 25/07/2017 नुसार मागणी केले असता लेखापरीक्षणास सादर केले नाही. त्यामुळे विस्तार अधिकारी यांनी शाळेना भेटी दिल्या किंवा कसे, याबाबत खुलासा करुन अनुपालन दर्शवावे.

9) वरील अभिप्रायांवरुन शाळेचे योजनानिहाय निधी शासनाच्या आर्थिक निकषानुसार व शासनाच्या नियम आदेश व परिपत्रके यानुसार खर्च केल्याचे व त्यामध्ये आर्थिक गैरव्यवहार झाले नसून पारदर्शकरीत्या खर्च केल्याची खात्री पटत नाही. शाळेचे आर्थिक व्यवहार पारदर्शक व योग्य निकषानुसार असल्याची खात्री पटत नाही.

### 4.103 शालेय पोषण आहार खर्चातील अनियमितता

**पंचायत समिती मंगरुळपीर, जिल्हा वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती, मंगरुळपीर सन 2016-2017 या वित्तीय वर्षात शालेय पोषण आहारावर रक्कम रुपये 30,86,529/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय पोषण आहार योजनांतर्गत सन 2016-2017 या आर्थिक वर्षामध्ये इंधन, भाजीपाला व पुरक आहार या बाबीकरीता इयत्ता 1 ते 5 व इयत्ता 6 ते 8 करीता एकुण रुपये 30,86,529/- एवढा खर्च नोंदविण्यात आल्याचे तपासणीचे वेळी आढळुन आले. परंतु, शाळेच्या मुख्याध्यापकाचे तथा केद्रप्रमुखांचे स्तरावरुन विदयार्थ्यांच्या पटसंख्येनुसार प्रपत्र ब मध्ये विदयार्थ्यांच्या पटसंख्येनुसार उपस्थिती दर्शवुन त्यानुसार शालेय पोषण आहारांतर्गत ग्रामीण तथा शहरी प्रती विदयार्थी ठरवुन दिलेल्या निकषानुसार शाळेनिहाय सादर करण्यात आलेल्या विवरणपत्रामधील माहिती अचुक असल्याबाबतची विभागाचे स्तरावर दहमहा तपासणी करुन असे प्रमाणित करण्यात आले नाही.

2) प्रपत्र अ मधील उपस्थिती अहवाल प्रत्येक महिन्याच्या 5 तारखेपर्यंत पंचायत समितीला प्राप्त हाणे आवश्यक आहे. परंतु, उपस्थिती अहवालावर आवक क्रमांक व दिनांक नमुद नाही. करीता अहवाल कधी प्राप्त झाले, याची पडताळणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2013/प्र.क्र.215/वि.वि.-3, दिनांक 06/03/2013 नुसार 1 ते 5 करिता 450 उष्मांक, 12 ग्रॅम प्रथिने व 6 ते 8 करिता 700 उष्मांक, 20 ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार देणे आवश्यक असतांना माहे मार्च 2017 मध्ये डिसेंबर-2014 ते फेब्रुवारी-2015 महिन्यातील देयकाचे प्रदान करण्यात आले व तसेच शाळा स्तरावर उपरोक्त बाब क्रमांक 1 प्रमाणे माहे फेब्रुवारी-2015 मध्ये सप्टेंबर-2014 ते डीसेंबर-2014 महिन्यातील देयकाचे प्रदान केल्याचे दिसते. वेळीच अनुदान मिळत नसल्यामुळे देण्यात येत असलेले आहार उपरोक्त उष्मांक व प्रथिनयुक्त देण्यात येत असलेबाबत खात्री पटत नाही.

4) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ/2010/ प्र.क्र.18 / प्रा.शि.4, दिनांक 02/02/2011 अन्वये शालेय पोषण आहारांतर्गत इंधन भाजीपाला व पुरक पोषण आहार याकरीता ठरवुन दिलेल्या ग्रामीण व शहरी भागाकरीता अन्न शिजवणे वर्ग 1 ते 5 व 6 ते 8 करीता नोंदविलेल्या खर्चाचे अनुषंगाने शासनाचे नियमानुसार आठवडयातुन किमान एक दिवस पुरक आहारामध्ये फळे सोयाबिस्कीट, दुध, चिक्की, बेदाने, राजगुरा इत्यादी देणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही होत असल्याबाबत अभिलेखे आढळुन आले नाही.

5) उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद 9 नुसार महिला बचतगट/ स्वयंसेवी संस्था यांचेकडुन ग्रामीण भागामध्ये अन्न शिजविणेकरीता शालेय शिक्षण व्यवस्थापन समितीचे नियंत्रणाखाली सदरचे काम बचतगट/ स्वंयसेवी संस्था यांचेकडुन करून घेण्यात येत असल्याबाबत अभिलेखे तपासणीस उपलब्ध झाले नाही.

6) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक पिआरई 2010/ प्र.क्र.217/ प्राशि.-1, दिनांक 17/06/2010 नुसार बालाकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009 चे कलम 21 नुसार खाजगी शाळेने शालेय व्यवस्थापन समिती स्थापन करुन खर्चास मंजुरी घेतल्याबाबतचे मुख्याध्यापकांचे अहवाल आढळुन आले नाही.

**4.104 आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांना आगाऊ वेतनवाढी प्रदान करनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती उमरखेड, जिल्हा यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती, उमरखेड येथील सन 2016-2017 चे लेखापरिक्षणात आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना आगाऊ वेतनवाढ देऊन थकित रक्कमेचे प्रदान प्रमाणक क्रमांक 1,822, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 2,24,352/- करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आवेवा-2009/प्र.क्र.46/ का-8, दिनांक 24/08/2017 अन्वये सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी अनुज्ञेय झाल्याच्या कालावधीत दिनांक 1/10/2006 ते 1/10/2015 आगाऊ वेतनवाढीचा लाभ देण्यात येवु नये, असे असतांना नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही व उपरोक्त नमुद प्रमाणकान्वये आगाऊ वेतनवाढ थकबाकी रुपये 2,24,352/- काढण्यात आलेली आहे.

त्यामुळे सदर रक्कमेबाबत जबाबदारी निश्चीत करुन रक्कम वसुल करुन शासन खाती जमा करण्यात यावी. आगाऊ दिलेल्या वेतनवाढी न देता पुन:श्च वेतननिश्चीती करण्यात यावी.

**4.105 केंद्र प्रमुख यांना नियमबाहयपणे प्रदान केलेल्या कायम प्रवास भत्ता प्रदान रक्कमेची वसूली होणेबाबत.**

**पंचायत समिती बाभुळगांव, जिल्हा यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती, बाभुळगाव अंतर्गत निवड महिन्यातील प्रदान केलेल्या प्रमाणकाची तपासणी केली असता केंद्र प्रमुख यांना कायम प्रवास भत्ता प्रदान केला असल्याचे आढळून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

केंद्र प्रमुख या पदासाठी कायम प्रवास भत्ता मंजूरीबाबत महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभाग, यांचेकडील शासन निर्णय/ परिपत्रक/ शासन आदेश नसतांना केंद्र प्रमुख यांना दरमहा रुपये 1,650/- या दराने कायम प्रवास भत्ता प्रदान केला आहे. नियमबाहय प्रदान रक्कमेची वसूली होणे आवश्यक आहे. पंचायत समिती, बाभुळगाव अंतर्गत एकूण 8 केंद्र प्रमुख यांना दरमहा रुपये 1,650/- या प्रमाणे एक महिन्याचे

रुपये 13,200/- इतके प्रदान केले आहे. सन 2016-2017 मधील एकूण 12 महिने X रूपये 13200/- = रुपये 1,58,400/- कायम प्रवास भत्ता रक्कमेचे नियमबाहय प्रदान केले आहे. नियमबाहय प्रदान रक्कमेची सबंधीताकडून वसूली होणे आवश्यक आहे.

तसेच यापुर्वी प्रदान केलेल्या कायम प्रवास भत्ता रक्कमेची आपले स्तरावर तपासणी करुन कायम प्रवास भत्ता प्रदान केला असल्याची त्याची वसूली करणे आवश्यक आहे.

**4.106 शिक्षकांना उन्हाळी सुटयांच्या कालावधीत वाहन भत्ता प्रदान करणेबाबत.**

**पंचायत समिती जळगाव जामोद, जिल्हा बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती, जळगाव जामोद येथील सन 2016-2017 या वित्तिय वर्षाचे लेखापरीक्षण करताना असे निर्दशनास आले की, शिक्षण विभागातील सहायक शिक्षकांना उन्हाळी सुटीच्या कालावधीत वाहतुक भत्ता प्रदान केलेला आहे. सन 2016-2017 मध्ये सर्व प्राथमिक शिक्षकाना माहे मे 2016 व जुन 2016 मध्ये उन्हाळी सुटया जाहिर असतात.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परीपत्रक क्रमांक वाहभ - 1099/प्र क्र 45/सेवा -5, दिनांक 09/05/2003 रोजीच्या परीपत्रकामधील अट क्रमांक 5 (i) अन्वये दिर्घ सुटीचा कालावधी असेल तर वाहतुक भत्ता अनुज्ञेय असणार नाही. असे नमुद असतांना सुध्दा वरील उन्हाळी सुटीच्या कालावधीत वाहतुक भत्ता प्रदान करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर परिपत्रकानुसार रजेच्या कालावधीतील सहायक शिक्षकांना देण्यात आलेला वाहतुक भत्ता रुपये 4,10,406/- संबंधीतांकडुन वसुल करुन चलनाने योग्य लेखाशिर्षाखाली भरणा करुन अनुपालन दर्शवावे

**4.107 संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण नसताना वेतनवाढी प्रदान करणेबाबत.**

**पंचायत समिती जळगाव जामोद, जिल्हा बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रंमाक मातंस/नस्ती 04/224/39, दिनांक 05/05/2007 नुसार दिनांक 01/01/2008 ते संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वेतनवाढी रोखुन ठेवणे आवश्यक असताना तशी कार्यवाही शिक्षण विभागाने केलेली नाही.

शिक्षण विभागाने पुरविलेल्या माहितीनुसार 8 सहायक अध्यापकाने अदयापही संगणक अहर्ता पुर्ण केलेली नाही. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण2000/प्र.क्रं..5/2001/39/, दिनांक 20/07/2002 नुसार कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.

2) सामान्य प्रशासन व पंचायत विभागाला अशी माहिती मागुनही कोणतीच माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आली नसल्यास संबधिताच्या वेतनवाढी रोखुन ठेवणबाबत कार्यवाही करण्यात यावी. तसेच दिनांक 01/01/2008 नतंर मंजुर करण्यात आलेल्या वेतनवाढी रद्द करुन ज्या दिनांकास संबधीतानी संगणक अहर्ता प्राप्त करुन घेतली आहे, त्या दिनांकापर्यंत जादा प्रदान झालेली वेतनवाढीची रक्कम वसुल करुन शासन लेखाशिर्षाखाली भरणा करुन पुर्तता दर्शवावी.

**4.108 दिर्घ कालीन सुटयामध्ये शिक्षकांना नियमबाहय वाहन भत्ता प्रदान खर्चाबाबत.**

**पंचायत समिती मलकापूर, जिल्हा बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती मलकापुर येथील सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता शिक्षकांना दिर्घ सुटया अनुज्ञेय असल्यामुळे त्यांना दिर्घ सुट्टीमध्ये वाहतुक भत्ता अनुज्ञेय नाही, असे असतांना सदर शिक्षकांना रक्कम रूपये 1,12,400/- वाहतुक भत्ता प्रदान करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, परीपत्रक क्रंमाक पी.आर.ई/2000/3497/2635/ प्रशि-1, दिनांक 04/02/2001 अन्वये 30 दिवसांपेक्षा जास्तं दिर्घकालीन सुटीसाठी वाहन भत्ता अनुज्ञेय नाही त्यामुळे वरील माहे मे-2016 च्या देयकामध्ये प्रदान करण्यात आलेला वाहतुक भत्ता अनुज्ञेय नाही.

2) दिर्घ सुटयांमध्ये विदयार्थ्यांना शालेय पोषण आहार देण्याबाबत मुख्यं कार्यकारी अधिकारी यांनी आदेश पारीत केल्याचे लेखापरीक्षणात सांगण्यात आले. परंतु, आदेशाची मागणी केली असता सदर आदेश लेखापरीक्षण तपासणीस उपलब्धं झाला नाही. सबब असे आदेश फक्तं जे शिक्षक/ मुख्याध्यापक शालेय पोषण आहाराचे काम सांभाळत असेल, त्याला हा आदेश लागु आहेत. ज्या शिक्षक / मुख्याध्यापक यांनी प्रत्यंक्ष दिर्घ सुटयामध्ये काम केले, त्यांना या कालावधीतील वाहतुक भत्ता अनुज्ञेय राहील. अशा शिक्षकांचा वाहतुक भत्ता वसुल करण्यात येवु नये. उर्वरीत सर्व शिक्षकांचा वाहतुक भत्ता वसुल करण्यात यावा

## 4.109 निवृत्ती वेतन धारकांचे हयातीचे प्रमाणपत्र नसतांना नियमबाहय निवृत्तीवेतन प्रदान करणे व इतर अनियमिततेबाबत.

**पंचायत समिती उमरेड, जिल्हा नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती उमरेड अंतर्गत शिक्षण विभागाचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षण केले असता विभागांतर्गत सेवानिवृत्त शिक्षकांना रक्कम रूपये 2,68,775/- निवृत्तीवेतनाचे प्रदान करण्यात आलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 70 ते 81 नुसार निवृत्तीवेतन धारकांचे विहीत नमुन्यातील हयातीचे प्रमाणपत्र घेउन खात्री करुन निवृत्तीवेतन प्रदान करणे आवश्यक असतांना पंचायत समिती उमरेड शिक्षण विभागांतर्गत उपरोक्त नमुद केलेल्या सेवनिवृत्त शिक्षकांना हयातीचे प्रमाणपत्र न घेताच त्यांना एकुण रक्कम रुपये 2,68,775/- चे नियमबाहय प्रदान केलेले आहे.

2) पंचायत समिती उमरेड शिक्षण विभागांतर्गत सेवनिवृत्त शिक्षकांचे P.P.O. नोंदवही लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही.

## 4.110 शालेय पोषण आहार योजनेतील अनियमितता

**पंचायत समिती आष्टी, जिल्हा वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 42) -** शालेय पोषण आहार योजने अंतर्गत लेखापरीक्षणास 10 निवडक शाळा व त्याव्यतीरीक्त इतर शाळेकडुन सादर करण्यात आलेल्या अभिलेख्यातील अनियमितताबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक 20/06/2009 नुसार भरारी पथकाची निर्मिती, विद्यार्थ्यांची प्रत्यक्षात उपस्थिती, मागणी याबाबतची पथकाने केलेली तपासणी केली असल्याचे निर्दशनास आले नाही.

2) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक 25/03/2014 नुसार शालेय पोषण आहार योजना केंद्रीय स्वयंपाक गृह तपासणीसाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करुन यंत्रणेने 15 दिवसातुन एकदा नियमितपणे भेट देणे व अन्नाचे नमुने तपासणीचे अहवाल प्राप्त केल्याचे आढळुन आले नाही.

3) शालेय पोषण आहार योजनेचा मासिक प्रगती अहवाल व वार्षीक फलनिष्पत्ती अहवाल लेखापरीक्षणास सादर केला नाही. त्यामुळे तालुक्यातील शालेय पोषण योजनेची प्रगती व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वाढ झाली किंवा नाही, याची तपासणी करता आली नाही.

4) मुद्दा क्रमांक ई 2 नुसार ग्रामीण भागातील शाळासाठी ग्रामशिक्षण समितीमध्ये शालेय पोषण आहार योजने संदर्भात 5 लाभार्थी विद्यार्थ्याच्या पालकांना आमंत्रित सदस्य म्हणुन घेवुन त्याद्वारे ग्राम शिक्षण समितीने शाळेमध्ये उपलब्ध होणारे अन्न धान्यादी मालापासुन विद्यार्थ्यांना आहार देण्याची व्यवस्था करावी. तथापि, अशी कार्यवाही झाल्याची माहीती नस्तीमध्ये आढळुन आलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक 2010/प्र.क्र.18/प्राशी-4, दिनांक 02/02/2011 नुसार पाककृती क्रमांक 1-4 तयार करुन विद्यार्थ्यांना पुरविल्याचे दिसुन येत नाही.

6) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, परीपत्रक क्रमांक शापोआ/2009/प्र.क्र.383/प्राशी-4, दिनांक 26/02/2010 मधील मुद्दा क्रमांक ड 2 नुसार गटास प्राप्त झालेला माल योग्य दर्जाचा व वजनाचा असल्याचे प्रमाणपत्र नोंदवुन पुरवठादाराकडुन सादर झालेले देयक शिक्षणाधिकारी(प्राथ) जिल्हा परिषद, वर्धा यांना सादर करावयाचे आहे. पंरतु, सादर साहित्य् योग्य् दर्जाचे व वजनाचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर न केल्याने शाहनिशा करता आली नाही.

7) सदर शालेय पोषण आहार योजनेचा मुळ उद्देश शालेय पोषण आहार योजनान्वये शाळेतील विद्‌यार्थ्यांचे उपस्थिती वाढविणे हा आहे. सदर योजनेमुळे विद्‌र्यार्थ्यांची उपस्थिती वाढली असल्याबाबतचे दस्ताऐवज लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही.

8) काही शाळांचे शालेय पोषण आहाराचे अभिलेखे तपासले असता बँक पासबुकमध्ये अनुदान असुनसुद्धा मुख्याध्यापकाकडुन किंवा इतर कर्मचाऱ्यांकडुन उसनवार घेवुन उसनवार रकमेएवढाच खर्च नोंदविलेला आहे.

**4.111 वैदयकिय परिपुर्ती देयकासोबत मुळ प्रमाणके नसतांना नियमबाहय देयक पारित केल्याबाबत.**

**पंचायत समिती साकोली, जिल्हा भंडारा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती शिक्षण विभागाअंतर्गत 11 कर्मचा-यांचे त्यांचे स्वत:च्या कुटुंबाच्या आजारपणाबददल वैदयकिय उपचाराबाबतचा प्रतिपुर्तीची देयके पारित करुन रक्कम रूपये 4,40,143/- प्रदान केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम 1961 मधिल नियमामधिल तरतूदी अन्वये खाजगी रुग्णालयात उपचार घेतले असता देयकासोबत खाजगी रुग्णालयातील उपचाराबाबत नमुना क, नमुना ड, उपचार करणा-या प्राधिकृत अधिका-यांनी भरुण स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. नमुना ड मधील खरेदी केलेल्या औषधीची बिले रुग्णालयाला प्रदान केलेली रकमेची पावती नियमाप्रमाणे आवश्यक कागदपत्रे जोडून उपचार घेतलेला आजार अतितातडीचा असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी प्रमाणित करुन त्यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असतांना कुठल्याही नियमाप्रमाणे कार्यवाही न करता संबधितास रक्कम प्रदान करणे नियमबाहय आहे. तरी रुपये 4,40,143/- वसुल करण्यात यावी.

**4.112 डेस्क बेंच खरेदीबाबत जिल्हा परिषद हायस्कूल मुढरी**

**पंचायत समिती मोहाडी, जिल्हा भंडारा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 29) -** सदरबाबत रक्कम रूपये 85,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खरेदी प्रकिया नियमाप्रमाणे न केल्याबाबत शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचे पत्र क्रमांक 1723, दिनांक 30/03/2017 अन्वये खंड विकास अधिकारी यांना रूपये 85,000/- अनुदान देण्यात आले. दिनांक 30/03/2017 ला अनुदान प्रदान केल्यानंतर राहूल इंटरप्रायजेस यांचेकडून 30/03/2017 लाच पूरवठा झालेला आहे. यावरुन कुठल्याही प्रकारे दरपत्रके घेवून योग्य दरात खरेदी झाली नाही, हे स्पष्ट होते.

2) साहित्याची नोंद जंगम मालमत्ता नोंदवहीत न घेतल्याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 प्रमाणे नियम 90 अन्वये जंगम मालमत्ता नोंदवही 32 मध्ये सदर साहित्याची नोंद घेणे बंधनकारक असतांना साहित्याची नोंद घेण्यात आलेली नाही.

**4.113 इयत्ता 1 ली ते 4 थी मध्ये शिकणा-या मूलींना उपस्थिती भत्ता वाटप करनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती लाखांदूर, जिल्हा भंडारा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 38) -** सदरबाबत 2 प्रमाणकांन्वये रक्कम रूपये 2,29,756/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2016-2017 चे उपस्थिती भत्ता मागणी केलेबाबत शाळानिहाय व केंद्रनिहाय तपशीलवार विवरणपत्र संचिकेत दिसून आले नाही.

2) उपस्थिती भत्ता वाटप केलेल्या प्रमाणात शाळांमध्ये मूलींची उपस्थिती कमीत कमी 75 टक्के असलेबाबत आणि सदर इयत्तेत शिकत असलेबाबतचे सबंधीत शाळांचे मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र नस्तीत दिसून आले नाही.

3) उपस्थिती भत्ता वाटप करण्यात येणा-या विदयार्थिनींचे पालकाचे नाव दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे यादीत असल्याबाबत संबंधीत ग्रामसेवक यांचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

4) उपस्थिती भत्त्याची रक्कम ग्रामशिक्षण समितीच्या सभेत वाटप केल्याचे व वाटप पत्रावर उपस्थित अध्यक्ष व सदस्य यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्याचे अहवाल सबंधीत शाळेकडून प्राप्त केलेले नाहीत.

5) उपस्थिती भत्ता पालकांना प्राप्त झालेबाबत शिक्षण विस्तार अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांनी विहित प्रमाणात भेटी देवून खात्री केल्याचे अभिलेखे नस्तीत दिसून आली नाहीत तसेच त्याबाबतचा अहवाल गट विकास अधिकारी यांना सादर केल्याचे दिसून आले नाही.

6) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परीषद, भंडारा यांचे अनुदान वितरण आदेश क्रमांक/भंजिप/शिक्षण/प्राथ/डे-15/1235/17 दिनांक 09/03/2017 नूसार विशेष घटक योजने अंतर्गत रूपये 1,39,920/- व बिगर आदिवासी क्षेत्र योजने अंतर्गत रूपये 1,69,840/- असे एकूण रूपये 3,09,760/- अनुदान वितरीत केले असून एकूण अखर्चित शिल्लक अनुदान रूपये 80,004/- परत केलेले नाही.

**4.114 संगणक अर्हता परीक्षा पास न करणा-या शिक्षकांचे वेतनवाढी न थांबता नियमबाहयरीता वेतन प्रदान करणे.**

**पंचायत समिती लाखनी, जिल्हा भंडारा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दिनांक 05/01/1999, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक 20/07/2002, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक 02/09/2003, शासन निर्णय प्रशासन विभाग दिनांक 05/05/2005 अन्वये शासकीय सेवेत कर्मचा-यांनी संगणक हाताळणे, वापराबाबतचे विहित प्रमाणपत्र शासनमान्य संगणक संस्थाकडून प्राप्त् करून सादर करण्याची तरतूद केली आहे. विहित कालावधीत संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण न केल्यास संबंधित कर्मचारी उक्त कालावधी समाप्त झाल्यानंतर परीक्षा उर्तीण होण्यापासून त्यांना सूट देण्यात येईपर्यंतच्या वयाची 50 वर्षे कालावधीपर्यंत किंवा ते संगणक हाताळणीचे विहीत प्रमाणपत्र उपलब्ध करून देईपर्यंत वेतनवाढीस पात्र ठरविण्यात आलेले आहे. तरी पंचायत समिती, लाखनीद्वारे 15 शिक्षकांना वरील अटी शर्तीची पुर्तता न करतांसुध्दा त्यांच्या वेतनवाढी न थांबवता नियमबाहयरीत्या वेतन वाढी प्रदान करण्यात आलेले आहे. त्यामुळे त्यांना प्रदान करण्यात आलेले वेतन वसूल करून शासन खाती जमा करण्यात यावे.

**4.115 स्टेशनरी व किरकोळ साहित्य खरेदीचे देयकासोबत बँकेत भरणा केलेल्या चालानचा बँकेतुन रक्कम काढणेसाठी दुबार वापर केल्याबाबत.**

**पंचायत समिती तिरोडा, जिल्हा गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रूपये 60,925/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र कोषागार निसम 1968 चे नियम 112 नुसार नमुना क्रमांक6 मधील व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 13 नुसार नमुना 2 मधील चलानचा वापर शासकीय रक्कम बँकेत तथा कोषगारात भरणा करण्यासाठी करावयाचा आहे. सदर जिल्हा परिषद हायस्कुल व कन्या कनिष्ठ महाविदयालय तिरोड यांचे लेखापरीक्षण करीत असताना असे निदर्शनास आले की, सदर हायुस्कुलने दिनांक 18/10/2016 ला रूपये 20,000/- व दिनांक 14/02/2017 रोजी रूपये 20,000/- असे एकुण रक्कम रूपये 40,000/- चा चलानद्वारे बँकेत भरणा करण्यात आला असल्याचे दिसून येते.

परंतु, सदर उपरोक्त पणे दर्शविण्यात आलेल्या त्याच चलनाचा खात्यातुन रककम काढण्यासाठी खर्चाचे बिजक म्हणून दुबार वापर करून रक्कम रूपये 40,000/- ची उचल केलेली आहे. त्यामुळे रक्कम रूपये 40,000/- चे

नियमबाहय प्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नसून सदर रकम जमा करण्यात आलेल्या चलानचा दुबार वापर करून रक्कम खात्यातुन काढता येत असल्याबाबतचे शासन निर्णय असल्यास तसे लेखापरीक्षणास दर्शवावे. अन्यथा वसुलीचे कार्यवाहीसह अनुपालन करावे

2) सदर नमुना 29 मध्ये काढण्यात आलेल्या प्रमाणक देयकातील रकमेत खोडतोड व पांढरी शाई लावून उपरीलेखन करण्यात आलेले आहे.

3) सदर प्रमाणकान्वये विविध पुरवठादराकडून कार्यालयीन उपयोगी स्टेशनरी व इतर साहित्य खरेदी केल्याचे दिसून येते. परंतु, लेखापरीक्षण वेळी साठा नोंदवही सादर न केल्याने साहित्य खरेदी व विनियोगाबाबत खात्री करता आलेली नाही. तरी तशी साधार पुराव्यासह खात्री पटवून दयावी

**4.116 बंगाली पाठयपुस्तक खरेदी बाबत.**

**पंचायत समिती अर्जुनी मोरगाव, जिल्हा गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,36,351/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 29(4) प्रमाणे रुपये 1,000/- वरील प्रदाने रेखांकित धनादेशाव्दारे प्रदान करणे आवश्यक असतांना गट शिक्षणाधिकारी यांनी संबधितास रोखीने प्रदान करुन प्रदान दर्शवून स्वत: रक्कम उचल करणे, ही बाब नियमाविरुध्द व संशयास्पद आहे.

2) सदर पुस्तके शाळाची मागणीबाबत कुठलाही अभिलेख पंचायत समितीला आढळुन आलेला नाही. तसेच हरिकृपा प्रिंटींग प्रेस गडचिरोली यांचे बिल क्रमांक 560/28.02.2016 रुपये 57,441/- व त्या अनुषंगीक वाहतुक खर्च रुपये 3,120/- केलेला आहे. साधारणता शैक्षणिक वर्ष हे मार्च - एप्रिल मध्ये संपत असतांना माहे फेब्रुवारी मध्ये पुस्तके खरेदी करण्याचा प्रश्नच उदभवत नाही. सदरची रक्कम रुपये 60,561/- संबधिताकडून वसुल करण्यात यावी.

**4.117 नियोजना अभावी पडुन असलेल्या सेसच्या शिल्लक राशीचे विनियोगा अभावी झालेल्या नुकसानीबाबत.**

**पंचायत समिती भद्रावती, जिल्हा चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 30,17,717/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती भद्रावतीचे पंचायत समिती सेसचे अंदाजपत्रक आणि रोखपुस्तकाचे अवलोकन केले असता सन 2016-2017 मध्ये एकुण रूपये 31,30,350/- इतक्या राशीची प्राप्ती असुन सुरुवातीची शिल्लक रूपये 40,87,616/- अशी एकुण रूपये 72,18,166/- इतकी जमा झाली. त्यापैकी सन 2016-2017 मध्ये रूपये 42,00,449/- इतका खर्च वजा जाता दिनांक 31/03/2017 ला रूपये 30,17,717/- इतका निधी रोख पुस्तकाला जमा दिसतो. सन 2016-2017 चे अंदाजपत्रक जरी मंजुर असले, तरी मागील काही वर्षाच्या अनुभवाच्या आधारावर खर्च साधारणत: जानेवारी ते मार्च च्या महिन्यात होत असतो. त्यामुळे एप्रिल 2016 पासुन अखर्चीत पंचायत समिती सेस बँकेत चालु खात्यात विनाकारण पडुन राहतो. चालु खात्यात असल्यामुळे त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळत नाही. अशा अखर्चीत राशीचे योग्य नियोजन केले आणि अल्पमुदतीसाठी राशी गुंतविल्यास त्यावर कमीत कमी 4 टक्के पर्यंत व्याज गृहीत धरल्यास दर महा रूपये 1,72,650/- पर्यंत व्याजापोटी मिळु शकतात. एप्रिल ते जानेवारी च्या दरम्यान सेससाठी अनुदान प्राप्त झाले, तर ती ही अल्पावधीसाठी गुंतवणुक करुन व्याजापोटी उत्पन्नात वाढ होऊ शकते. तरी पंचायत समितीकडे लेखापरीक्षणाच्या तारखेला पंचायत समिती सेस मध्ये रूपये 30,17,717/-इतकी शिल्लक होते. योग्य नियोजन व विनियोग केल्यास मिळणाऱ्या उत्पन्नातुन पंचायत समिती जनतेकरीता योजना तयार करु शकेल.

पंचायत समितीने वेळीच नियोजन न केल्यामुळे वार्षिक रूपये 1,72,650 /- अंदाजे नुकसान होत आहे. याबाबत समर्पक अनुपालन सादर करावे.

**4.118 रजा प्रवास सवलत रक्कम 25,31,820/- नियमबाह्यपणे प्रदान करणेबाबत.**

**पंचायत समिती राजुरा, जिल्हा चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 25) -** सदरबाबत रक्कम रूपये 25,31,820/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास-1101/प्र.क्र. 48/सेवा-5, दिनांक 06/10/2002 अन्वये देयकांत तिकिट क्रमांक, आसान क्रमांक, दिनांक इत्यादी तपशील नमूद करणे आवश्यक असेल, असे स्पष्ट नमुद असतांना सुध्दा सर्वच कर्मचा-यांनी सदर प्रवास हा आरक्षणाने केला असल्याने देयकांत बोगी क्रमांक व सीट क्रमांक नोंदविणे आवश्यक असतांना रजा प्रवास सवलतीच्या सर्वच देयकांत रेल्वे स्टेशनवर तिकिट जमा केली असल्याने तिकिट सादर करता येत नाही, असे नमुद करण्यांत आले असून कोणत्याही देयकांत बोगी क्रमांक व सीट क्रमांक न नोंदविल्याने सदर प्रवासाबाबत संशय निमार्ण होतो. त्यामुळे सदर रजा प्रवास सवलतीची रक्कम लेखापरीक्षणांत मंजूर करता येत नसुन वसुलीस पात्र ठरते.

2) रजा प्रवास सवलत मंजूरी आदेश हा सावंतवाडी येथील असतांना ब-याच कर्मच्या-यांनी गणपतीपुळे येथे म्हणजे मंजूर नसलेल्या ठिकाणी प्रवास करून नियमबाह्यरित्या प्रवास करून सवलती फायदा घेतला असल्याने लेखापरीक्षणांत मंजूर करता येत नसून वसुलीस पात्र ठरते.

3) ब-याच कर्मचा-यांनी रजा प्रवास सवलत ही दिनांक 31/10/2016 ते 05/11/2016 या कालावधीत उपभोगलेली असून सदर रजा प्रवास सवलतीचा मंजूरी आदेश हा दिनांक 28/11/2016 चा, त्याचप्रमाणे रजा प्रवास सवलत दिनांक 18/12/2016 ते 22/12/2016 या कालावधीत उपभोगली तर मंजूरी आदेश हा दिनांक 19/12/2016 चा आहे. म्हणजे प्रथम रजा प्रवास सवलत उपभोगली व नंतर मंजूरी आदेश घेण्यांत आले व संबंधितांना नियमबाह्यरित्या रकमेचे प्रदान करण्यांत आले आहे. त्यामुळे सदर सवलत ही प्रथम उपभोगली व नंतर मंजूरी आदेश घेतल्याने सदर रजा प्रवास सवलतीचा खर्च हा लेखापरीक्षणांत मान्य करता येत नसून वसुलीस पात्र ठरते.

4) ब-याच देयकासोबत रजा प्रवास सवलतीचे मंजूरी आदेश नसतांनाही रजा प्रवास सवलत मंजूर करून नियमबाह्यरित्या रकमेचे प्रदान करण्यांत आल्याने सदर रक्कम लेखापरीक्षणांत मान्य करता येत नसुन वसुलीस पात्र ठरते.

5) सावंतवाडी / गणपतीपुळे येथे वास्तव्य केल्याबाबत वास्तव्याच्या पावतीवर पावती क्रमांक व दिनांक नमुद करण्यांत आलेला नाही.

6) ब-याच कर्मच्या-यांच्या रजा प्रवास सवलतीच्या आदेशावर मंजूरी आदेश क्रमांक व दिनांक नमुद करण्यांत आलेला नाही.

7) ब-याच रजा प्रवास सवलतीच्या देयकासोबत प्रवास केल्याबाबतचा आवश्यक तो दस्तऐवज व पुरावा जोडण्यांत आलेला नाही. त्यामुळे संबंधितांनी सदर सवलत न उपभोगताच रकमेची उचल केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

8) रजा प्रवास सवलतीच्या देयकासोबत जोडण्यांत आलेल्या वास्तव्याचा / हॉटेलच्या पावत्या हया नोंदणीकृत / अधिकृत पावती नसतांना (त्यावर CST/BST क्रमांक नसतांना) सुध्दा रजा प्रवास सवलत मंजूरी करून संबंधितांना रकमेचे प्रदान केल्याचे दिसून येते.

9) लेखापरीक्षण पथकाचे अर्धसमास पत्र क्रमांक 8 दिनांक 07/09/2017 अन्वये शिक्षण विभागाकडील रजा प्रवास सवलतीचे मंजूरी आदेश नोंदवही व सेवापुस्तकांची मागणी करूनही मंजूरी आदेश नोंदवही व सेवापुस्तके लेखापरीक्षणास सादर करण्यांत आलेली नाही.

उपरोक्त नमुद लेखापरीक्षण अभिप्रायानुसार रजा प्रवास सवलतीवर नोंदविलेल्या खर्चाची एकूण रक्कम रूपये 25,31,820/- लेखापरीक्षणांत मान्य करता येत नसुन संपूर्ण रक्कम वसुलीस पात्र ठरते.

**4.119 शालेय पोषण आहार योजने अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेनी केलेल्या खर्चा बाबत**.

**पंचायत समिती राजुरा, जिल्हा चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 29) -** सदरबाबत रक्कम रूपये 5,65,048/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अ) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ2010/प्र.क्र.18/प्राशि 4, दिनांक 02/02/2011 चे परिच्छेद क्रमांक 05 नुसार आठवड्यातुन किमान एक दिवस व्दि्यार्थीना पूरक आहार, परिच्छेद क्रमांक 06 नुसार आहार बनविणेसाठी लागणारे स्थानिक पातळीवर उपलब्ध होणारा भाजीपाला व अन्य पाककृतीनुसार वस्तूंची शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे शाळेनी खरेदी केली नाही

ब) शालेय पोषण आहार योजने अंतर्गत शाळा विद्यार्थी उपस्थिती, साहित्य दैनदीनी साठा नोंदवही उपलब्ध केली नाही.

क) शालेय पोषण आहार योजने अंतर्गत काम करणारे शिक्षक यांना मानधन रुपये 1,000/- अदा केले आहे. रक्कम स्विकृत शिक्षक यांचे व्यवस्थापन नियुक्ती आदेश उपलब्ध केले नाही.

ड) शालेय पोषण आहार योजने अंतर्गत अन्न शिजविणेकरीता महिला स्वयंपाकी /मदतनिस रुपये 1,000/- प्रमाणे प्रती महीना मानधन अदा केली. स्वयंपाकी / मदतनिस महिला यांची नियुक्ती आदेश, कामाचा करारनामा उपलब्ध केले नाही.

ई) शालेय पोषण आहार योजने अंतर्गत शिजविलेले अन्न विदयार्थीना वाटप करणेपूर्वी विद्यार्थी पालक यांनी दैनिक भोजन पौष्टिक आहार चविष्ठ तपासणी केली नाही.

एफ) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत शिजविलेले अन्न विदयार्थीना वाटप करणेपूर्वी व्यवस्थापन शिक्षक, मुख्यध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती यांनी दैनिक शिजविलेले भोजन पौष्टिक आहाराची चविष्ठ तपासणी केली नाही.

जी) शालेय पोषण आहार योजने अंतर्गत भाडी व्यवस्थापन व दुरुस्ती रुपये 950/- रक्कमेचा विनियोग त्याच कारणासाठी केलेला नाही.

**4.120 शिक्षण विभागाअंतर्गत शिक्षकांना प्रदान केलेल्या सन 2013-16 या गट वर्षाचे रजा प्रवास सवलत देयकातील अनियमितता.**

**पंचायत समिती सावली, जिल्हा चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 15,34,124/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणकाची तपासणी केली असता संबधिताच्या देयकास गटशिक्षणाधिकारी यांची मंजुरी आदेश नसल्याचे दिसून आले, तरी प्रमाणकास मुळ तिकीट नसुन सर्व देयकास जोडलेल्या तिकीटाची तपासणी केली असता सर्व तिकीट एक सारखेच असल्याचे दिसुन आले असुन, संगणकावर सदर तिकीट तयार केल्याचे स्पष्ट होते. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रप्रस-1114/प्र.क्र.11/सेवा-5, दिनांक 10/06/2015 चे अट क्रमांक 11 ची टीप क्रमांक 6 नुसार देयकासोबत प्रवास केलेल्या वाहनाचे रेल्वे / बस यांचे मुळ तिकीट जोडणे बंधनकारक असतांना देयकास जोडलेल्या तिकीटांना सक्षम प्राधिकारी यांनी स्वत: तपासलेबाबत प्रमाणित केल्याचे प्रमाणपत्र संलग्न नसल्याने कोणत्याही प्रकारची तपासणी न करता देयकास मंजुरी न घेता रक्कम संबंधीतांना प्रदान केल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे.

2) रजा प्रवास सवलतीचे देयक प्रदानापूर्व सदर रजा प्रवास सवलतीची नोंद सेवा पुस्तकात घेणे आवश्यक असतांना तशी नोंद संबंधीतांच्या सेवापुस्तकात आढळून आली नसल्याने एकाच गट वर्षात दुबार लाभ उपभोगण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) वरील शासन निर्णयातील अट क्रमांक 11 मधील टीप क्रमांक 4 नुसार या सवलती अंतर्गत खाजगी वाहनाने केलेल्या प्रवास खर्चाची प्रतिपुर्ती संबंधीत कर्मचाऱ्यास अनुज्ञेय असलेल्या रेल्वे / सार्वजनिक वाहनाच्या भाड्याच्या सिमित करुन देय राहील, असे नमुद असतांना खाजगी बसचे भाडेचे जोडलेल्या तिकीटाप्रमाणे संपूर्ण भाडेचे प्रदान केलेले आहे वरील देयकाची तपासणी केली असता खाजगी बसचे भाडे सार्वजनिक बसचे भाड्याशी सिमित केले नसल्याने संबंधीताला जादा प्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी याबाबत योग्य त्या दस्ताऐवजासह अनुपालन करुन दाखवावे. तसेच सदर वर्षात इतर महिन्यात शिक्षण विभागाचे अश्याच प्रकारचे रजा प्रवास सवलतीचे देयके काढले असल्यास वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**4.121 आयकर कपातीबाबत.**

**पंचायत समिती कोरपना, जिल्हा चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रूपये 1877,072/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2016-2017 चे लेखापरिक्षणास पंचायत समिती, कोरपना येथील शिक्षण विभागातील शिक्षकांचे वेतन देयके, 6 व्या वेतन आयोगाची थकबाकीची देयके, रजावेतन देयके, वेतन थकबाकी व आयकर गणनापत्रक यांची तपासणी केली असता आयकर विवरणपत्र नमुना-16 मध्ये 5 शिक्षकांचे 6 व्या वेतन आयोगाच्या थकबाकी रक्कमा, रजावेतनाच्या रक्कम व वेतनाची थकबाकी या रक्कमांची परिगणना नमुना-16 मध्ये करण्यात आलेली नाही. आयकर नियमाप्रमाणे वेतन व भत्याच्या रक्कमा ज्या 31 मार्च पर्यन्त प्राप्त झाल्या आहे किंवा जमा झालेल्या आहे, त्यांची परिगणना नमुना-16 मध्ये करुन त्यावर आयकर आकारावा लागतो. असे असतांना थकबाकीच्या रक्कमांची परिगणना करण्यात न आल्यामुळे रक्कम रुपये 33,870/- ही वसुलपात्र ठरते.

2) आयकर अधिनियमानुसार आपल्या अधिनस्त आस्थापनेवरील उर्वरीत सर्व कर्मचा-याबाबत आयकराची कपात करण्यात येत आहे किंवा नाही, याबाबत खात्री करावी. नियमानुसार कार्यवाही होत नसल्यास फरकाची रक्कम कपात करुन पुर्तता अहवाल सादर करावा किंवा बरोबर कपात करण्यात येत असल्याचे खात्रीबाबत प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर करावे.

**4.122 रजा प्रवास सवलत देयके प्रदानातील गंभिर अनियमितताबाबत**

**पंचायत समिती कोरपना, जिल्हा चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 23,56,378/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सर्व 375 कर्मचा-यांचा रजा मंजुरी आदेश क्रमांक 516/2016, दिनांक 27/10/2016 हा एकच देण्यात आलेला आहे.

2) रजा प्रवास सवलत देयकातील प्रवासाचे अंतर हे अचुक नोंदविण्यात आलेले नाही.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रप्रस-1114/प्र.क्र.11/सेवा-5, दिनांक 10/06/2015 मधील 11(3) या तरतुदीप्रमाणे प्रवासाचे दोन्ही ठिकाणे रेल्वेने जोडलेली असल्यास तो प्रवास रेल्वेने करणे आवश्यक असतांना तो प्रवास बसने दर्शवुन त्याप्रमाणेच तिकिटांचे दर देयकामध्ये दर्शविण्यात आलेला आहे.

4) कर्मचा-यांचे रजा अर्ज, रजा प्रवास सवलतीची मागणी करणारा अर्ज व संबधित कर्मचा-यांचे मुळ सेवापुस्तकांची मागणी अर्धसमास पत्र क्रमांक 02, दिनांक 24/08/2017 अन्वये मागणी केली असता सदर अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

5) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रप्रस-1114/प्र.क्र.11/सेवा-5, दिनांक 10/06/2015 मधील बाब क्रमांक 07 या तरतुदीप्रमाणे पती किंवा पत्नी शासकिय / निमशासकिय सेवेत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र देयकासोबत जोडण्यात आले नसुन लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

6) देयकातील प्रवास हा खाजगी वाहनाने नोंदवुन देयकामध्ये बस / किंवा रेल्वेचे दराप्रमाणे नोंदविण्यात आलेला असुन त्याप्रमाणे उचल करण्यात आली आहे. सदर देयकासोबत जोडण्यात आलेल्या खाजगी प्रवास भाडयाच्या पावत्याची तपासणी केली असता त्यामध्ये पावतीवर संम्पर्क क्रंमाक नोंदविण्यात आलेला नाही. तसेच पावतीवर प्रती किमी. चे दर नमुद नाही, टोल टॅक्सची पावती नाही. जोडण्यात आलेल्या पावत्या दोन प्रकारच्या पेनने माहिती लिहण्यात आलेली आहे. पावत्या अनुकमे क्रमांकाचा जोडण्यात आलेल्या आहेत. पावतीवर paid by me लिहुन त्यावर सबंधितांनी दिनाकिंत स्वाक्षरी केली नाही तसेच निवासाच्या पावतीवर रुम क्रमांक नोंदविण्यात आलेले नाही.

7) रजा प्रवास सवलत देयकामधील अवलंबित कुटुबांचे सदस्यांचा तपशिलाचे विवरणपत्रामध्ये सदस्यांच्या जन्म दिनांक नोंदविण्यात आलेला नाही. त्यामुळे देयकात दर्शविण्यात आलेल्या सदस्यांच्या वयाबाबतची तपासणी करता आली नाही.

8) सदर देयकांची तपासणी ही शिक्षण विभाग व लेखाविभाग यांनी शासकिय नियमाप्रमाणे न करता शासकिय रक्कम खर्च करण्याच्या उदेशाने सर्व रजाप्रवास सवलतीचे देयके नियमबाहयपणे मंजुर करुन संबधित कर्मचा-यांना त्याचा लाभ देण्यात आलेला आहे.

9) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रप्रस-1114/प्र.क्र.11/सेवा-5, दिनांक 10/06/2015 मधील 11(6) या तरतुदीप्रमाणे रजा प्रवास सवलत उपभोल्यानंतर प्रवासखर्चाचे देयकासोबत रेल्वे किंवा बसची तिकिटे सादर करणे बंधनकारक राहील, अशी तरतुद असतांना कोणत्याही (ज्यानी खाजगी वाहनाने प्रवास केला व ज्यांनी रेल्वे / बस प्रवास केला) रजा प्रवास सवलत उपभोगणा-या शिक्षक कर्मचा-यांनी रेल्वे किंवा बसची तिकिटे देयकासोबत जोडण्यात आलेली नसतांना सदर रजा प्रवास सवलतीची सर्वच देयके मंजुर करण्यात आलेली आहे.

10) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रप्रस-1114/प्र.क्र.11/सेवा-5, दिनांक 10/06/2015 मधील 13 या तरतुदीप्रमाणे रजा प्रवास सवलतीचा लाभ घेणा-या व त्यांना सदर सवलत मंजुर करणा-या अनुक्रमे कर्मचारी / अधिकारी यांचेकडुन संगनमताने खोटी बिले सादर करुन, मंजुर करुन घेतल्याचे आढळल्यास, कडक शिक्षेस पात्र राहतील, असे शासनाचे आदेश असतांना सुध्दा वरीलप्रमाणे रजा प्रवास सवलतीचे देयकामध्ये गंभीर स्वरुपाच्या अनियमितता असतांना सुध्दा 375 शिक्षकांचे देयके मंजुर करुन त्यावर शासकिय रक्कम रुपये 23,56,378/- ऐवढा खर्च नोंदविण्यात आलेला आहे. जो नियमबाहय आहे.

**4.123 शालेय पोषण आहार योजना खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती आरमोरी, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 21) -** पंचायत समिती, आरमोरीचे सन 2016-2017 वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण कालावधीत वर्ग 01 ते 05 व वर्ग 06 ते 08 मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन शिजवुन वाटप करणेकरीता शालेय पोषण आहार अंतर्गत इंधन व भाजीपाला, स्वयंपाकी/मदतनीस व मुख्याध्यापक/शिक्षक मानधनाची रक्कम शिक्षण विभागाकडुन संबंधीत शाळांना वितरीत केल्याबाबत प्रमाणकान्वये रक्कम रूपये 31,00,733/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अन्न शिजवण्यासाठी आवश्यक तांदुळ, दाळ, तेल, तिखट व मसाले इत्यादी प्राप्त साठा व दररोज प्रती विदयार्थी अन्न वाटपाच्या नोंदवहीची प्रत पंचायत समितीने प्राप्ती केल्याचे आढळले नाही.

2) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ/2010/प्रक18/प्रशा4, दिनांक 02/02/2011 नुसार वापरलेल्या आहाराकरीता भाजीपाल्याबाबत दर दिवसाचे स्वतंत्र बिल न घेता सरसकट एकच बील घेतल्याने प्रत्येक दिवशी देण्यात आलेल्या आहाराबाबत पडताळणी करता आली नाही.

3) दररोजचा आहार हा दर्जेदार व गुणवत्ताप्रमाणे असल्यबाबत मुख्याध्यापक यांचे प्रमाणपत्र प्राप्त केले नाही. तसेच गट शिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी, शिक्षण यांनी शाळेला भेट देवुन वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबाबत अहवाल नस्तीसोबत आढळले.

4) शालेय पोषण आहार अंतर्गत इयत्ता 01 ते 05 व 06 ते 08 करीता इंधन व भाजीपाला, स्वयंपाकी / मदतनीस मानधन व अन्य खर्चाकरीता प्राप्त तरतुदीमधुन खर्च वजा जाता उर्वरित शिल्लक अखर्चित रक्कम रूपये 1,27,229/- बाबत कार्यवाही केल्याचे दिसुन आले नाही.

**4.124 केद्रं प्रमुख यांना कायम प्रवास भत्ता देय नसताना नियमबाहय प्रदाना बाबत.**

**पंचायत समिती लोहा, जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** पंचायत समिती लोहा चे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात पंचायत समिती, लोहा अतंर्गत गटशिक्षण अधिकारी कार्यालयातील केंद्र प्रमुख यांचे निवड महिण्यातील वेतन व भत्ते सबंधी देयके तपसाली असता केंद्र प्रमुख यानां नियमबाहय कायम प्रवास भत्ता रक्कम रुपये 8,39,482/- प्रदान केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उपसचिव यांचे परिपत्रक क्रमांक पीआरई -2012/प्र.क्रं.77/प्राशि 1/शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, दिनांक 22/03/2013 अन्वये केंद्र प्रमुखांना शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक 14/11/1994 शासन

निर्णयानुसार वेत्तन उद्दीष्टांमधुन रुपये 200/- एवढा कायम प्रवास भत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे. सदर कायम प्रवासभत्ता वित्त विभागाच्या मुबंई नागरी सेवा नियम 1959 मधील नियम 383 अन्वये लागु करण्यात आला नाही. यास्तव वित्त विभागाच्या दिनांक 03/03/2010 च्या शासन निर्णयान्वये कायम प्रवास भत्त्याच्या दरात सुधारणा करण्यात आली असली, तरी सदर दर रुपये 1,650/- केंद्र प्रमुखाना लागु होत नाहीत, असे स्पष्ट असताना कायम प्रवास भत्ता प्रदान केलेला आहे. त्यामुळे जादा प्रदानातील अर्थिक वर्षातील एप्रिल 2016 ते मार्च 2017 पर्यंत रक्कम वसुल करुन जादा प्रदानाची रक्कम परिगणितीय करावी व जादा प्रदानाची रक्कम शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

**4.125 विशेष घटक योजनेतंर्गत 103 विकास गट या लेखा शिर्षातंर्गत इयत्ता 1 ली ते 4 थीच्या वर्गामध्ये शिक्षण घेत असलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमाती (एस.सी / एस.टी. / व्हि.जे. / एन.टी.) प्रवर्गामधील विद्यार्थ्यांना नियमबाहयरित्या मोफत गणवेश वाटप केलेबाबत.**

**पंचायत समिती उमरगा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15 व 16) -** पंचायत समिती, उमरगाचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात जिल्हा परिषद शाळातंर्गत इयत्ता 1 ली ते 4 थी मध्ये शिकत असलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमाती (व्ही.जे.एन.टी.) प्रवर्गामधील विद्यार्थ्यांना विशेष घटक योजनेतंर्गत 103 विकास गट लेखाशिर्षातून रक्कम रुपये 1,15,752/- चे मोफत गणवेश वाटप केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक - पीआरई-1096/(48/96)/प्राशि-4, दिनांक 13/09/1996 अन्वये राज्यातील 103 विकास गटातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळातील इयत्ता 1 ते 4 थीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व लेखण साहित्य पुरविण्याची योजना सुरु करण्यात आली

2) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 नुसार व महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसए-2011/प्र.क्र.38/प्राशि-4, दिनांक 04/02/2011 अन्वये सर्व शिक्षा अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेतंर्गत शालेय विद्यार्थ्यांना मोफत गणवेश पुरविणे ही योजना सुरू करण्यात आली. सदर योजना शासकीय शाळा आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळामधील इयत्ता 1 ते 8 वीच्या वर्गातील सर्व मुली व अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीचे सर्व मुले आणि दरिद्र्य रेषेखालील पालकांची मुले यांच्याकरीता लागू आहे.

3) राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या मोफत गणवेश वाटप योजनेतील लाभार्थी (जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जातीच्या इयत्ता 1 ली ते 4 थीतील विद्यार्थी) हे केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमातंर्गत राबविण्यात येणाऱ्या मोफत गणवेश वाटप योजनेतील लाभार्थी (शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांमधील इयत्ता 1 ली ते 8 वीच्या वर्गातील सर्व मुली व अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीतील सर्व मुले आणि दारिद्रय रेषेखालील पालकांची मुले) देखील आहेत. त्यामुळे दोन्ही योजनांची व्दिरुक्ती (डुप्लीकेशन) होते.

4) केंद्र शासनामार्फत मोफत गणवेश वाटप योजना राबविण्यात येत असतांना राज्य शासनाकडून त्याच लाभार्थ्यांसाठी त्याचप्रकारची योजना राबवून राज्य शासनाचा निधी खर्च करणे संयुक्तीक ठरणार नाही.

5) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2013/(67/13)/प्राशि-5, दिनांक 31/10/2013 अन्वये राज्य शासनामार्फत राबविण्यात येणा-या मोफत गणवेश वाटप योजनेतील लाभार्थी (जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जातीच्या इयत्ता 1 ली ते 4 थीतील विद्यार्थी) हे केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमातंर्गत राबविण्यात येणाऱ्या मोफत गणवेश वाटप योजनेतील लाभार्थी (शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या इयत्ता 1 ली ते 8 वीच्या सर्व मुली व अनुसूचित जाती / जमातीची सर्व मुले आणि दारिद्रय रेषेखालील पालकांची मुले) असल्याने दोन्ही योजनांची व्दिरुक्ती (डुप्लीकेशन) होते. ही बाब विचारात घेऊन राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी मोफत गणवेश वाटप योजना या शासन निर्णयाच्या दिनांकापासून बंद करण्यात येत आहे.

6) पंचायत समिती, उमरगाने सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात विशेष घटक योजनेतंर्गत 103 विकास गट लेखाशिर्षातून जिल्हा परिषद शाळेत इयत्ता 1 ली ते 4 थीच्या वर्गामध्ये शिक्षण घेत असलेले विमुक्त जाती व भटक्या जमाती (व्ही.जे.एन.टी.) प्रवर्गामधील विद्यार्थ्यांना उक्त परिच्छेद क्रमांक 1 मध्ये नमुद केलेल्या नियमांनुसार नियमबाह्यरित्या मोफत गणवेश वाटप केले आहेत.

7) केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियान योजनेतून कोणकोणत्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप केले आहेत, याची यादी लेखापरीक्षणास गट शिक्षण कार्यालयाने दर्शवली नाही. त्यामुळे राज्य शासनाच्या विशेष घटक योजनातंर्गत 103 विकास गट लेखाशिर्षातून त्याच लाभार्थ्यांना मोफत गणवेश वाटप केलेबाबत लेखापरीक्षणात खात्री पटत नाही.

8) पंचायत समिती उमरगाने सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात विशेष घटक योजनेतंर्गत 103 विकास गट या लेखाशिर्षातून इयत्ता 1 ली ते 4 थीच्या वर्गामध्ये शिक्षण घेत असलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमाती (व्ही.जे.एन.टी.) प्रवर्गामधील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप केलेबाबतचा खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. पंचायत समिती, उमरगाने मोफत गणवेश वाटपावरील केलेला खर्च रक्कम रुपये 2,61,905/- वसूल करुन शासन खाती भरणा करुन लेखापरीक्षणास पुर्तता दर्शवावी.

**4.126 शिक्षक समायोजनाबाबत.**

**पंचायत समिती चाकूर, जिल्हा लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) व**

**पंचायत समिती जळकोट, जिल्हा लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** पंचायत समिती, जळकोट अंतर्गत गट शिक्षणाधिकारी कार्यालय जळकोट सन 2016-2017 अतिरीक्त ठरलेल्या शिक्षकाचे समायोजन झालेले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जि.प.व511/प्र.क्र.54/आ-14 दिनांक 18/05/2011 अन्वये दरवर्षी दिनांक 30 सप्टेबर अखेर जिल्हा परिषदेतील शाळातील विदयार्थ्यांची पटसंख्या निश्चित केल्यानंतर त्याआधारे अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा जादा प्राथमिक शिक्षकांच्या समायोजनाने बदल्या करण्याचे आदेश दिलेले आहेत.

2) उपरोक्त शासन निर्णयातील अनुक्रमांक 9 नुसार समायोजनाची तारीख 30 सप्टेंबर विचारात घेवुन प्रचलीत नियमानुसार पटसंख्या व शिक्षकांच्या संख्या निश्चीत करावी. त्या अनुषंगाने 20 ऑक्टोबरपर्यंत विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी मान्यतेची कार्यवाही पुर्ण करणे आवश्यक राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुदतीत प्रस्ताव सादर करुनही जर विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी प्रस्तावाला 25 ऑक्टोबरपर्यंत कोणताही निर्णय कळविला नाही, तर मान्यता गृहीत धरुन कोणत्याही परिस्थितीत 31 ऑक्टोबरपर्यंत जिल्हयातील समायोजनाचे काम पुर्ण करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) वरील शासन निर्णयातील अट क्रमांक 12 मध्ये समायोजनासाठी विहीत कालावधी ठरवुन दिलेल्या असुन सदरची कार्यवाही जिल्हा परिषद अंतर्गत विहीत कालावधीत होणार नाही. जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना जबाबदार धरण्याबाबतचे आदेशात नमुद केलेले आहे.

4) शिक्षकांचे समायोजन विलंबाने झालेले आहे. त्यामुळे समायोजन विहीत कालावधीत झाले नसल्यामुळे वेतन व भत्ते यावरील खर्च रक्कम वाया गेलेली आहे.